## MAHARASHTRA ACT No. XLVII OF 1969

## THE BOMBAY BUILDING REPAIRS AND RECONSTRUCTION BOARD ACT, 1969

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक २९ सप्टेंबर १९६९ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. बल्लाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XLVII OF 1969

**AN ACT TO PROVIDE FOR A CERTAIN TIME FOR THE REPAIR OR RECONSTRUCTION OF DANGEROUS BUILDINGS, TO PROVIDE FOR REHOUSING OF DISHOUSED OCCUPIERS, AND FOR THOSE PURPOSES TO LEVY AN ADDITIONAL CESS ON BUILDINGS AND LANDS AND FOR MATTERS CONNECTED WITH THE PURPOSES AFORESAID.**

[ राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक १ ऑक्टोबर १९६९ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

## सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७

**धोकादायक इमारतींची दुरुस्ती किंवा पुनर्रचना यांकरिता विवक्षित मुदतीसाठी तरतूद करणे, बेघर झालेल्या भोगवटदारांसाठी पुन्हा घरांची तरतूद करणे आणि त्या प्रयोजनांकरिता व उपरोक्त प्रयोजनांशी संबंधित बाबींकरिता इमारती व जमिनींवर जादा उपकर आकारणे यासाठी.**

ज्याअर्थी, दर वर्षी बृहन्मुंबईत मोठ्या प्रमाणावर घरे कोसळून, अनेक व्यक्ती निर्वासित होत असल्यामुळे व मोठ्या प्रमाणावर जीवित व वित्तहानी होत असल्यामुळे तो प्रश्न, गेले कित्येक दिवसांपासून राज्य शासन व बृहन्मुंबईची महानगरपालिका याचा चिंतेचा विषय झालेला आहे ;

आणि ज्याअर्थी, दर वर्षी मोठ्या प्रमाणावर घरे कोसळल्यामुळे घरटंचाईच्या तीव्रतेत भर पडत आहे आणि कायदा व सुव्यवस्था यांच्याही नवनवीन समस्या पुढे येत आहेत व कामाच्या शोधार्थ भारताच्या जवळ जवळ सर्व भागांमधून मुंबईत येणाऱ्या माणसांच्या अविरत लोंढ्यामुळे या समस्या अधिकच बिकट होत चालल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, धोकादायक इमारतींची दुरुस्ती किंवा पुनर्रचना हाती घेण्याकरिता पुरेशा वित्तीय साधनांनी आणि आवश्यक त्या तांत्रिक ज्ञानांनी युक्त आणि पुरेशी प्रशासकीय यंत्रणा असलेल्या शासकीय अभिकरणाची उभारणी करणे आवश्यक झाले आहे ;

आणि ज्याअर्थी, घरांच्या पडझडीस प्रतिबंध करणे आणि मोडकळीस आलेल्या इमारती वाचविणे यासाठी यथोचित विधिविधान अधिनियमित करण्याबाबतचे प्रस्ताव, लोकमत अजमावण्यासाठी म्हणून शासकीय अधिसूचना, नगरविकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग, क्रमांक डी.बी.आर. १०६८-ई, दिनांक ३ जून १९६८ द्वारे प्रसिद्ध करण्यात आले होते ;

आणि ज्याअर्थी, शासनाकडे आलेल्या शिफारशी, सूचना व आक्षेप विचारात घेतल्यानंतर ज्या तात्काळ पडण्याची शक्यता आहे अशा धोकादायक इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती करून, व दुरुस्ती करणे शक्य नसलेल्या, मोडकळीस आलेल्या इमारती संपादन करून व त्यांची पुनर्रचना करून आणि अशा इमारतींच्या दुरुस्त्यांमुळे, किंवा पुनर्रचनेमुळे किंवा त्या कोसळल्यामुळे बेघर झालेल्या भोगवटदारांसाठी पुन्हा घरांची तरतूद करून पूर्वोक्त समस्येला तोंड देण्यासाठी एखाद्या मंडळाच्या स्थापनेची विवक्षित मुदतीसाठी तरतूद करणे, पूर्वोल्लेखित बाबींवरील खर्च भागविण्याकरिता इमारतींवर व जमिनींवर तात्पुरता जादा उपकर बसविण्याची तरतूद करणे आणि पूर्वोक्त प्रयोजनाशी संबंधित बाबींची तरतूद करणे इष्ट आहे असे वाटते; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या विसाव्या वर्षी, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण १

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ आणि कालावधी.

१. (१) या अधिनियमास, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ अधिनियम, १९६९ असे म्हणता येईल.

(२) तो बृहन्मुंबईस लागू असेल.

(३) हा संपूर्ण अधिनियम, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियुक्त करील अशा तारखेस प्रथमतः मुंबई शहरात अंमलात येईल. राज्य शासनास, तद्वत प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिसूचनेद्वारे ते नियुक्त करतील अशा तारखेस किंवा तारखांना बृहन्मुंबईच्या उरलेल्या भागांत किंवा त्यातील वेगवेगळ्या क्षेत्रात, संपूर्ण अधिनियम अंमलात आणता येईल.

(४) हा अधिनियम ३१ डिसेंबर १९७९ या तारखेपर्यंत—ती तारीख धरून—अंमलात राहील, आणि त्यानंतर तो समाप्त होईल ; आणि या अधिनियाच्या समाप्तीनंतर, मुंबई सामान्य परिभाषा अधिनियम, १९०४ याचे कलम ७ हे जणू उक्त अधिनियम महाराष्ट्र अधिनियमाद्वारे त्यावेळी रद्द करण्यात आला असल्याप्रमाणे, लागू होईल.

व्याख्या.

२. संदर्भावरून दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर या अधिनियमात—

(अ) "मंडळ" म्हणजे, कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले मंडळ ;

(ब) "मंडळाच्या जागा" म्हणजे, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, राज्य शासनाच्या मालकीच्या किंवा राज्य शासनाकडे निहित असतील किंवा शासनाने भाडेपट्ट्यावर घेतल्या असतील किंवा महानगरपालिकेने किंवा महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाने, वापरासाठी म्हणून, मंडळाकडे सोपविल्या असतील अशा मंडळाच्या स्वाधीन करण्यात आलेल्या कोणत्याही जागा ;

(क) "इमारत" या संज्ञेत, भाड्याने दिलेले किंवा भाड्याने देण्याचा इरादा असलेले किंवा स्वतंत्रपणे भोगवट्यात असलेले भाडेघर आणि घर, उपगृह, तबेला, छपरी, झोपडी आणि अशी इतर कोणतीही बांधणी यांचा समावेश होईल. परंतु तीत, संपूर्णपणे अनधिकृत असेल अशी कोणतीही इमारत किंवा बांधणी यांचा किंवा मुंबई महानगरपालिका अधिनियम, याच्या कलम ३, खंड (सब) यात व्याख्या केल्याप्रमाणे तात्पुरती इमारत असेल, अशा कोणत्याही इमारतीचा समावेश होणार नाही ;

(ड) "उपकर" म्हणजे, या अधिनियमान्वये बसविलेला किंवा बसविता येईल असा इमारतींवरील किंवा जमिनीवरील कर;

(इ) "अध्यक्ष" म्हणजे मंडळाचा अध्यक्ष ;

(फ) "मुख्य कार्यकारी अधिकारी" म्हणजे, मंडळाचा मुख्य कार्यकारी अधिकारी ;

(ग) "आयुक्त" म्हणजे, बृहन्मुंबईचे नगरपालिका आयुक्त;

(ह) "महानगरपालिका" म्हणजे, बृहन्मुंबईची महानगरपालिका;

(आय्) "जमीन" या संज्ञेत, जीवर इमारत उभारण्यात येत असेल किंवा आली असेल अशी जमीन, जमिनीपासून मिळणारे फायदे, आणि भूबद्ध किंवा कोणत्याहि भूबद्ध वस्तूंशी कायम जोडण्यात आलेल्या वस्तू यांचा समावेश होईल;

(जे) "सदस्य" म्हणजे, मंडळाचा सदस्य व त्यात, अध्यक्षाचा किंवा उपाध्यक्षाचा समावेश होईल;

(के) "बिनसरकारी सदस्य" म्हणजे, पदसिद्ध सदस्य नसणारा सदस्य;

(एल्) "भोगवटदार" या संज्ञेचा अर्थ, मुंबई महानगरपालिका अधिनियमात तिचा जो अर्थ दिला आहे तोच असेल;

(एम्) कोणत्याही जागांच्या संदर्भात "मालक" ही संज्ञा वापरण्यात आली असेल तेव्हा "मालक" या संज्ञेचा अर्थ, उक्त जागांचे भाडे जिला मिळत असेल किंवा जागा भाड्याने दिल्या असत्या तर त्यांचे भाडे मिळण्याचा जिला हक्क असेल अशी व्यक्ती; आणि या संज्ञेत—

(एक) मालकासाठी जो असे भाडे घेत असेल असा अभिकर्ता किंवा विश्वस्त;

(दोन) धार्मिक किंवा धर्मादाय प्रयोजनासाठी असलेल्या कोणत्याही जागांचे भाडे ज्याला मिळत असेल किंवा उक्त जागा ज्याच्याकडे सोपविण्यात आली असेल किंवा तिच्याबद्दल जो जबाबदार असेल असा, अभिकर्ता किंवा विश्वस्त;

(तीन) उक्त जागांचा प्रभार घेण्यासाठी किंवा उक्त जागांच्या मालकाच्या अधिकाराचा वापर करण्यासाठी सक्षम अधिकारिता असलेल्या कोणत्याही न्यायालयाने नेमलेला न्यायालय-धारक, पृथक्कर्ता (सेक्वेस्ट्रेटर) किंवा व्यवस्थापक, यांचा समावेश होईल;

(न) "जागा" या संज्ञेत, भाड्याने दिलेली किंवा देण्याचा हेतू असलेली किंवा स्वतंत्रपणे भोगवट्यात असलेली कोणतीही इमारत किंवा तिचा भाग, यांचा समावेश होईल;

(ओ) "विहित" म्हणजे, नियमाद्वारे विहित केलेले;

(पी) "करयोग्य मूल्य" या शब्दप्रयोगास मुंबई महानगरपालिका अधिनियमात जो अर्थ देण्यात आला आहे तोच अर्थ असेल;

(क्यू) "विनियम" म्हणजे कलम ६० अन्वये मंडळाने केलेले विनियम;

(आर्) "नियम" म्हणजे कलम ५९ अन्वये राज्य शासनाने केलेले नियम;

(स्) "संरचनात्मक दुरुस्त्या" म्हणजे, भार सहन करणाऱ्या भिंती किंवा इमारती लाकडाचे बांधकाम, आर.सी.सी. (सिमेन्ट काँक्रीट) रूपांतरित करून किंवा या दोहोंना एकत्रित करून करण्यात आलेला बांधकामाच्या पद्धतीतील बदल धरून, इमारतींचे जे घटक भाग किंवा तिचा कोणताही महत्वाचा भाग किंवा जिने, मार्ग, संडास किंवा शौचकूप यासारखा भोगवटदारांना जिथे सामाईक प्रवेश असेल असा कोणताही भाग, हे कुजले असतील, त्यांना तडा गेला असेल किंवा जे ओळंब्यात नसतील अशा भागाऐवजी तत्सम सामानाचे किंवा सामानांचे किंवा निराळ्या सामानाचे किंवा सामानांचे नवीन घटक भाग बसवून करण्यात आलेल्या व मंडळाचे मते जी दुरुस्ती किंवा जे बदल शीघ्रतेने करण्यात आले नाही तर इमारत कोसळण्याचा संभव असेल अशी दुरुस्ती व बदल; [आणि कोणत्याही इमारतीच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या, मंडळाकडून, अशा दुरुस्त्या पार पाडण्यात येतील, तेव्हा त्या इमारतीची या अधिनियमान्वये संरचनात्मक दुरुस्ती झाली असल्याचे समजण्यात येईल.]

(टी) "वर्ष" म्हणजे, एप्रिलच्या पहिल्या दिवशी सुरू होणारे वर्ष.

## प्रकरण २

### मंडळाची स्थापना, कामकाज व रचना

**मंडळाची स्थापना.** ३. राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारा, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी "मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ" या नावाचे मंडळ स्थापन करील.

**मंडळाची रचना.** ४. (१) मंडळ खालील सदस्यांचे मिळून होईल :—

(अ) उपमंत्री, गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य, पदसिद्ध अध्यक्ष;

(ब) अध्यक्ष, महानगरपालिकेची सुधार समिती, पदसिद्ध उपाध्यक्ष;

(क) राज्य शासनाने नियुक्त केलेला शासनाचा मुख्य अभियंता, पदसिद्ध;

(ड) महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाचे गृहनिर्माण आयुक्त, पदसिद्ध;

(इ) महानगरपालिकेचे उपआयुक्त (सुधारणा) पदसिद्ध;

(फ) महानगरपालिकेचा शहर अभियंता, पदसिद्ध;

(ज) राज्य शासनाने नियुक्त केलेले महानगरपालिकेचे तीन सभासद;

(ह) राज्य शासनाच्या मते, ज्याना अभियांत्रिकी व वास्तुशास्त्र या विषयांचे विशेष ज्ञान किंवा प्रत्यक्ष अनुभव आहे, अशा राज्य शासनाने नियुक्त केलेल्या दोन व्यक्ती;

(आय्) राज्य शासनाने नियुक्त केलेले, मालमत्ता मालकांचे दोन व भाडेकरूंचे दोन प्रतिनिधी;

(जे) राज्य शासनाने नियुक्त केलेला वित्त विभागातील शासनाचा उपसचिव, पदसिद्ध;

(के) शासनाचा गृहनिर्माण प्रभारी उप-सचिव, पदसिद्ध, तो, मंडळाचा सचिवही असेल.

(२) पोट-कलम (१) अन्वये नियुक्त केलेल्या सदस्यांची नावे, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील.

**बिनसरकारी सदस्यांचा पदावधी व सेवेच्या शर्ती.** ५. (१) प्रत्येक बिनसरकारी सदस्य, त्याच्या नियुक्तीच्या तारखेपासून, तीन वर्षांच्या मुदतीपर्यन्त पद धारण करील:

परंतु, राज्य शासनास, उक्त मुदत एक वर्षाहून अधिक नसेल इतक्या मुदतीपर्यन्त वाढविता येईल :

आणखी असे की, एखाद्या व्यक्तीची नियुक्तीची मुदत संपल्यानंतर, ती अनर्ह ठरविण्यात आली नसेल किंवा पदावरून दूर करण्यात आली असेल तर, ती पुनर्नियुक्तीसाठी पात्र असेल;

तसेच, महानगरपालिकेच्या सभासदांची नियुक्ती करण्यात आली असेल त्याबाबतीत, तो महानगरपालिकेचा सभासद असण्याचे चालू राहील तोपर्यन्तच तो मंडळाच्या बिनसरकारी सदस्याचे पद धारण करण्याचे चालू ठेवील.

(२) प्रत्येक बिनसरकारी सदस्याला, मंडळाच्या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी किंवा असा सदस्य म्हणून कोणतीही इतर कामे पार पाडताना आलेला व्यक्तीगत खर्च भागविण्यासाठी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, भत्ता मिळेल.

(३) बिनसरकारी सदस्याना द्यावयाचा भत्ता, मंडळाच्या निधीमधून देण्यात येईल.

**बिनसरकारी सदस्यांचा राजीनामा.** ६. कोणत्याही बिनसरकारी सदस्याला कोणत्याही वेळी राज्य शासनाला उद्देशून लेखी स्वरूपात आपल्या सहीनिशी, आपल्या पदाचा राजीनामा देता येईल, आणि तो स्वीकारण्यात आल्यावर सदस्याचे पद रिकामे होईल.

७. जर कोणताही सदस्य, वैकल्यामुळे किंवा अन्यथा, आपली कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ झाला असेल किंवा रजेवर किंवा त्याचे पद रिकामे होणार नाही अशा रीतीने अन्यथा अनुपस्थित राहील तर त्याचे काम पहाण्यासाठी या अधिनियमाखालील किंवा त्या अन्वये करण्यात आलेले कोणतेही नियम किंवा विनियम यांखालील त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी, राज्य शासनाला दुसऱ्या व्यक्तीची स्थानापन्न नेमणूक करता येईल. तात्पुरता सदस्यांची तात्पुरती अनुपस्थिती.

८. (१) जर एखादी व्यक्ती— बिनसरकारी सदस्यांच्या अनर्हता.

(अ) राज्य शासनाधीन कोणतेही पद किंवा लाभपद धारण करीत असेल ;

(ब) विकल मनाची असेल, आणि सक्षम न्यायालयाने तिला तसे घोषित केले असेल;

(क) अमुक्त नादार असेल;

(ड) मंडळाच्या कामकाजासंबंधी राज्य सरकारशी किंवा राज्य सरकारद्वारा किंवा राज्य सरकारच्या वतीने करण्यात आलेल्या कोणत्याही करारात किंवा सेवायोजनात तिचा स्वतःचा किंवा कोणत्याही भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल;

(इ) मंडळाच्या कामकाजासंबंधी राज्य सरकारशी किंवा राज्य सरकारद्वारा किंवा राज्य सरकारच्यावतीने करण्यात आलेल्या कोणत्याही करारात किंवा सेवायोजनात जिचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशा, कोणत्याही कायद्याने संस्थापित केलेल्या, कंपनीचा संचालक किंवा सचिव, व्यवस्थापक किंवा इतर वेतनी अधिकारी असेल; किंवा

(फ) नैतिक अधोगतीचा समावेश होईल अशा कोणत्याही अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आली असेल किंवा दोषी ठरली असेल;

तर ती, बिनसरकारी सदस्य म्हणून, नियुक्ती होण्यास किंवा चालू राहण्यास अनर्ह ठरेल.

(२) तथापि, मंडळाच्या कामकाजासंबंधीची कोणतीही जाहिरात ज्यात समाविष्ट केलेली असेल अशा कोणत्याही वर्तमानपत्रात एखाद्या व्यक्तीचा किंवा ती, कायद्याने संस्थापित केलेल्या ज्या कंपनीची संचालक, सचिव, व्यवस्थापक किंवा इतर वेतनी अधिकारी असेल त्या कंपनीचा, हिस्सा किंवा हितसंबंध आहे केवळ याच कारणावरून, पोट-कलम (१) च्या खंड (ड) किंवा (इ) अन्वये उक्त व्यक्ती अनर्ह ठरणार नाही किंवा उक्त खंडांच्या अर्थानुसार कोणत्याही करारात किंवा सेवायोजनात तिचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असल्याचे मानण्यात येणार नाही.

(३) एखादी व्यक्ती कायद्याने संस्थापित केलेल्या कोणत्याही कंपनीची भागधारक आहे याच केवळ कारणावरून ती पोट-कलम (१), खंड (ड) किंवा (इ) अन्वये अनर्ह ठरणार नाही किंवा उक्त खंडांच्या अर्थानुसार कोणत्याही करारात किंवा सेवायोजनात कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असलेल्या कंपनीत तिचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असल्याचे मानण्यात येणार नाही :

परंतु, अशी व्यक्ती, तिने धारण केलेल्या हिश्श्याचे स्वरूप व मर्यादा राज्य शासनाकडे उघड करील.

९. कोणताही सदस्य, आपली कर्तव्ये बजावताना गैरवर्तणुकीबद्दल दोषी आहे किंवा सदस्य म्हणून आपली कर्तव्ये पार पाडण्यास अक्षम आहे किंवा असमर्थ झाला आहे किंवा इतर कोणत्याही उचित आणि पुरेशा कारणासाठी त्यास पदावरून दूर करण्यात आले पाहिजे असे राज्य शासनाचे मत होईल तर, राज्य शासनास, सदस्याला त्यास पदावरून दूर करण्याविरुद्धची कारणे दर्शविण्याची संधी दिल्यानंतर शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्यास पदावरून दूर करता येईल. सदस्यांना पदावरून दूर करणे.

**सदस्यत्वाची पदरिक्तता.**

१०. एखादा बिनसरकारी सदस्य,—

(अ) कलम ८ मध्ये उल्लेखिलेल्या अनर्हतांपैकी कोणत्याही अनर्हतेच्या अधीन होईल; किंवा

(ब) लागोपाठ दोन महिन्यांच्या मुदतीसाठी, मंडळाच्या सर्व सभांना, मंडळाच्या परवानगी-विना अनुपस्थित राहील, तर तो, सदस्य असण्याचे बंद होईल.

**रिकाम्या झालेल्या जागा भरणे.**

११. (१) कोणत्याहि सदस्याचे पद रिकामे झाल्याचे प्रसंगी, राज्य शासनास रिकामी जागा भरता येईल आणि अशी नियुक्ती केलेली व्यक्ती, जिच्या जागी तिला नियुक्त करण्यात आले असेल त्या व्यक्तीने जितक्या मुदतीपर्यन्त पद धारण केले असते तेवढयाच मुदतीपर्यन्त पद धारण करील.

(२) सदस्याचे रिकामे पद, व्यवहार्य असेल तितक्या लवकर, भरण्यात येईल :

परंतु, असे कोणतेही पद रिकामे असताना, चालू असलेल्या सदस्याना, जणू कोणतेही पद रिकामे झाले नसल्याप्रमाणे, काम करता येईल.

**कार्यकारी समिती.**

१२. (१) मंडळाची कार्यकारी समिती असेल व ती,—

(अ) कलम ४, पोट-कलम (१), खंड (क) अन्वये राज्य शासनाने नियुक्त केलेला शासनाचा मुख्य अभियंता;

(ब) महानगरपालिकेचा शहर अभियंता;

(क) गृहनिर्माण आयुक्त, महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ;

(ड) मंडळाने याबाबतीत सदस्यांमधून निवडलेले इतर दोन सदस्य; त्यापैकी एक मालमत्ता मालकांचा प्रतिनिधी असेल व दुसरा भाडेकरूंचा प्रतिनिधी असेल;

(ई) कलम ४, पोट-कलम (१), खंड (क) अन्वये राज्यशासनाने नियुक्त केलेला वित्त विभागातील शासनाचा उपसचिव ;

यांची मिळून होईल.

(२) मुख्य अभियंता, कार्यकारी समितीचा अध्यक्ष असेल आणि मंडळाचा सदस्य सचिव हा कार्यकारी समितीचासुद्धा सचिव असेल.

(३) मंडळाचे नियंत्रण, निदेशन आणि अधीक्षण यास अधीन राहून, कायकारी समिती, मंडळाच्या क्षमतेतील कोणत्याही बाबीसंबंधात कार्यवाही करण्यास समक्ष असेल.

(४) समितीची बैठक होण्यासाठी आवश्यक असलेली गणपूर्ती कार्यकारी समितीच्या तीन सदस्यांची मिळून होईल.

**इतर समित्यांची नियुक्ती.**

१३. मंडळास, त्याच्या मते समितीकडून जी प्रयोजने चांगल्या रीतीने विनियमित होतील व चालविली जाऊ शकतील अशा प्रयोजनांसाठी, आपल्या सदस्यांमधून, त्यास योग्य वाटतील अशा (तंत्र समिती धरून) इतर समित्या नियुक्त करता येतील व त्या, मंडळास योग्य वाटतील इतक्या सदस्यांच्या मिळून होतील व त्या मंडळास योग्य वाटतील अशा मुदतीकरिता राहतील. आणि मंडळास लादणे योग्य वाटतील अशा निर्बंधासह किंवा शर्तीसह, आपल्या शक्तींपैकी किंवा कामांपैकी कोणत्याही शक्ती किंवा कामे अशा कोणत्याही समितीकडे त्यास सोपविता येतील. अशा समित्यांच्या कामकाजाचे नियमन, या बाबतीत करण्यात येतील अशा विनियमांनुसार करण्यात येईल.

**मंडळाच्या सभा.**

१४. (१) अध्यक्ष ठरवील अशा वेळी आणि अशा ठिकाणी, मंडळाच्या सभा महिन्यातून निदान एकदा भरविण्यात येतील.

(२) अध्यक्ष किंवा त्याच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष आणि अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्या अनुपस्थितीत, उपस्थित सदस्यांनी आपल्यामधून निवडलेला इतर कोणताही सदस्य मंडळाच्या सभेत अध्यक्ष म्हणून काम पाहील.

(३) मंडळाच्या सभेतील सर्व प्रश्नांचा निर्णय, उपस्थित असलेल्या व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या बहुमताने करण्यात येईल, आणि समसमान मते पडतील त्या बाबतीत, अध्यक्ष म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीस दुसरे किंवा निर्णायक मत असेल व ती त्याचा वापर करील.

(४) मंडळाची बैठक होण्यासाठी आवश्यक असलेली गणपूर्ती मंडळाच्या सदस्यांच्या एकूण संख्येच्या एक-तृतीयांश सदस्यांची मिळून होईल.

(५) मंडळाच्या सभाना उपस्थित असणाऱ्या सदस्यांची नावे आणि या अधिनियमाच्या उपबंधान्वये मंडळाच्या सभेला उपस्थित असणाऱ्या इतरांची नावे आणि प्रत्येक सभेचे कामकाज त्या प्रयोजनासाठी ठेवण्यात येणाऱ्या एका कार्यवृत्त पुस्तकात नमूद करण्यात येईल. पुढील सभेत अशा सभेचे कार्यवृत्त पक्के करण्यात आल्यानंतर त्यावर स्वाक्षरी करण्यात येईल आणि ते, कोणत्याही सदस्याला, तपासण्यासाठी कार्यालयीन वेळात खुले ठेवण्यात येईल.

(६) पूर्वोक्तप्रमाणे अधीन राहून, मंडळ आपले कामकाज पार पाडण्याच्या बाबतीत विनियमाद्वारे तरतूद करण्यात येईल अशा कार्यपद्धतीच्या नियमांचे पालन करील.

**कामकाज योग्य व वैध असल्याचे गृहीत धरून चालणे.**

१५. मंडळाचे किंवा समित्यांपैकी कोणत्याही समितीचे कोणतेही कृत्य किंवा कामकाज हे जर अन्यथा ते या अधिनियमाच्या उपबंधानुसार असेल तर, उक्त मंडळात किंवा समितीत कोणतेही पद रिकामे आहे किंवा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष किंवा सदस्य म्हणून काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या नेमणूकीत कोणताही दोष आहे याच केवळ कारणावरून अवैध असणार नाही.

**तज्ज्ञांशी विचारविनिमय किंवा सहयोग.**

१६. (१) मंडळास या अधिनियमाखालील आपल्या कामांपैकी कोणतीही कामे पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी ज्यांचे सहाय्य किंवा सल्ला त्यास आवश्यक वाटेल अशा व्यक्तीस राज्य शासनाच्या पूर्वमंजूरीने स्वतःशी सहयोगी करून घेता येईल किंवा तिच्याशी विचारविनिमय करता येईल; मंडळास आपल्या निधीतून राज्य शासन मंजूर करील त्याप्रमाणे, अशा व्यक्तींना पारिश्रमिक किंवा फी किंवा भत्ते देता येतील.

(२) अशा रीतीने मंडळाशी सहयोगी करण्यात आलेल्या किंवा सल्ला देणाऱ्या व्यक्तीला, ज्या प्रयोजनासाठी तिला सहयोगी करण्यात आले असेल किंवा तिच्याशी विचारविनिमय करण्यात आला असेल त्या प्रयोजनाशी संबंधित असलेल्या मंडळाच्या चर्चेत भाग घेता येईल, परंतु तिला सभेमध्ये मतदान करण्याचा किंवा मंडळाच्या इतर प्रयोजनांसंबंधातील चर्चेमध्ये भाग घेण्याचा अधिकार असणार नाही.

(३) मंडळाने तसे करण्यास भाग पाडल्यास, आयुक्तास आदेशाद्वारे, दोनपेक्षा अधिक नसतील अशा आपल्या अधिकृत प्रतिनिधींना, मंडळाच्या कोणत्याही सभेत उपस्थित राहण्यासाठी आणि मंडळाच्या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी प्रतिनियुक्त करता येईल, परंतु अशा प्रतिनिधींस मतदानाचा अधिकार असणार नाही.

**अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती.**

१७. मंडळाच्या शक्तींचे व कामांचे कार्यक्षम कार्यपालन व्हावे यासाठी राज्य शासन, वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य तंत्र अधिकारी, एक किंवा अधिक तंत्र अधिकारी, मुख्य लेखा अधिकारी आणि मंडळाला आवश्यक वाटतील असे इतर अधिकारी व कर्मचारी मंडळाच्या स्वाधीन करील; आणि शासनास, कोणत्याही वेळी, इतर कामासाठी त्यांना परत बोलावून घेता येईल.

**आस्थापनेची अनुसूची तयार करणे व ठेवणे.**

१८. प्रत्येक वर्षाच्या १ मे पूर्वी, मंडळ त्या वर्षाच्या एप्रिलच्या पहिल्या दिवशी असेल त्याप्रमाणे आस्थापनेची अनुसूची तयार करील व ती ठेवील; तीत पुढील गोष्टी दर्शविण्यात येतील:—

(एक) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी ज्यांना नोकरीवर ठेवणे मंडळास आवश्यक आणि योग्य वाटेल अशा अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची (रोजावर असतील अशा किंवा ज्यांच्या वेतनाची आकारणी हंगामी कामावर करण्यात येत असेल अशा कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त) संख्या, त्यांची पदनामे व श्रेणी आणि वेतनश्रेणी;

(दोन) अशा प्रत्येक अधिकाऱ्याला व कर्मचाऱ्याला द्यावयाच्या वेतनाची, भत्यांची व फीची रक्कम आणि त्यांचे स्वरूप;

(तीन) अशा प्रत्येक अधिकाऱ्याच्या आणि कर्मचाऱ्याच्या बाबतीत, रजा वेतन, निवृत्तीवेतन, भविष्य निर्वाह निधी किंवा कोणत्याही इतर प्रयोजनासाठी द्यावयाची रक्कम.

अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेच्या शर्ती.

१९. मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मंडळाचे अधीन काम करणारे इतर शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांचे पारिश्रमिक व सेवेच्या इतर शर्ती राज्य शासन ठरविल त्याप्रमाणे असतील.

कर्मचाऱ्यांवरील मंडळाचा खर्च.

२०. मंडळाच्या अधीन काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना देय असलेले वेतन, भत्ते, फी व इतर पारिश्रमिक धरून, मंडळाने केलेला सर्व खर्च, मंडळाच्या निधीतून भागविण्यात येईल.

## प्रकरण ३

### मंडळाच्या शक्ती, कर्तव्ये व कामे

मंडळाची कर्तव्ये.

२१. राज्य शासनाचे नियंत्रण, निदेशन व पर्यवेक्षण यांस अधीन राहून, पुढील गोष्टी करणे हे मंडळाचे कर्तव्य असेल:—

(अ) प्रकरणाची निकड व साधनसंपत्तीची उपलब्धता विचारात घेऊन मंडळास आवश्यक वाटेल अशा प्राथम्यक्रमानुसार ज्या इमारतींच्या संबंधी उपकर बसविण्यात आला असेल अशा इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती, अशा इमारतींच्या मालकांकडून किंवा भोगवटदारांकडून त्याबद्दल कोणताही खर्च वसूल केल्याशिवाय हाती घेणे व ती पार पाडणे;

(ब) अशा कोणत्याही इमारतीची दुरुस्ती हाती घेतली जाईल तेव्हा किंवा इमारत कोसळेल तेव्हा, अशा इमारतीच्या भोगवटदारांसाठी तात्पुरत्या किंवा पर्यायी निवासव्यवस्थेची तरतूद करणे;

(क) मंडळाकडे सोपविलेल्या सर्व जागांच्या संबंधात सर्वसाधारण आणि निवासयोग्य दुरुस्त्या वेळोवेळी हाती घेणे;

(ड) ज्यांचे संबंधात उपकर बसविण्यात आला असेल आणि मंडळाच्या मते, ज्यांची दुरुस्ती करणे शक्य नसेल अशा जुन्या व मोडकळीस आलेल्या मालमत्ता संपादन करण्यासाठी राज्य सरकारला विनंती करणे, आणि उक्त मालमत्तांमधील शक्य तितक्या अधिक भोगवटदारांची निवासव्यवस्था करण्याच्या प्रयोजनार्थ, त्यावर नवीन इमारती पुन्हा बांधणे किंवा पुन्हा बांधण्याची व्यवस्था करणे आणि इतर बाधित भोगवटदारांसाठी पर्यायी निवासव्यवस्थेची तरतूद करणे;

(इ) ज्यांच्या संबंधात उपकर बसविण्यात आला असेल आणि मंडळाकडून ज्यामध्ये एकदा संरचनात्मक दुरुस्ती करण्यात आली असेल, परंतु मंडळाच्या मते, ज्यांच्या संबंधात आणखी संरचनात्मक दुरुस्त्या करणे शक्य नसेल किंवा आर्थिकदृष्टया फायद्याचे नसेल, अशा जुन्या व मोडकळीस आलेल्या मालमत्ता संपादन करण्यास राज्य सरकारला विनंती करणे आणि उक्त मालमत्तांमधील शक्य तितक्या अधिक भोगवटदारांची निवासव्यवस्था करण्याच्या प्रयोजनार्थ त्यावर नवीन इमारती पुन्हा बांधणे किंवा पुन्हा बांधविणे; व इतर बाधित भोगवटदारांसाठी पर्यायी निवासव्यवस्थेची तरतूद करणे;

(फ) प्रकरणाची निकड आणि साधनांची उपलब्धता लक्षात घेऊन, आपल्या कार्यक्षेत्रामध्ये, घरे कोसळल्यामुळे, आगीमुळे, मुसळधार पावसामुळे किंवा वादळामुळे बाधा पोहोचलेल्या व्यक्तीसाठी तात्पुरत्या निवासव्यवस्थेची तरतूद करण्याच्या दृष्टीने मान्यताप्राप्त अभिकरणामार्फत, संक्रमण शिबिरांची उभारणी करणे किंवा उभारणी करविणे;

(ग) धोकादायक आणि मोडकळीस आलेल्या इमारती किंवा वाजवी खर्च करून दुरुस्त करणे शक्य नसतील असे त्यांचे भाग पाडून टाकण्याची कार्यवाही करणे व त्याद्वारे मानवी जीविताचे रक्षण करणे;

(ह) राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने, या अधिनियमाखालील किंवा तदन्वये आपल्या शक्ती, कर्तव्ये व कामे पार पाडणे सुकर व्हावे म्हणून इतर सर्व गोष्टी करणे.

**मंडळाच्या विशेष शक्ती.**

२२. (१) या अधिनियमान्वये असलेल्या आपल्या शक्तींचा वापर करताना, आपली कर्तव्ये करताना आणि कामे पार पाडताना मंडळास---

(अ) कोणत्याही इमारतीची किंवा जमिनीची कोणतीही चौकशी, तपासणी, सर्वेक्षण, मोजणी, मूल्यांकन यासाठी किंवा तिची सपाटी मोजण्यासाठी किंवा कोणत्याही संरचनात्मक दुरुस्त्या करण्यासाठी किंवा या अधिनियमान्वये किंवा तदन्वये प्राधिकृत केलेले कोणतेही काम किंवा या अधिनियमाच्या किंवा तदन्वये नेमलेल्या कोणत्याही नियमाच्या किंवा विनियमाच्या कोणत्याही उपबंधाच्या कोणत्याही प्रयोजनार्थ किंवा अशा कोणत्याही उपबंधानुसार जे काम करणे आवश्यक असेल असे काम पार पाडण्यासाठी सहाय्यक किंवा कामकरी यांच्यासह किंवा त्यांच्याशिवाय, कोणतीही इमारत किंवा जमीन यामध्ये किंवा तीवर प्रवेश करण्याचा प्राधिकार, सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे कोणत्याही व्यक्तीस देता येईल :

परंतु, अशा शक्तींचा वापर करण्यापूर्वी, ज्या प्रयोजनासाठी प्रवेश करण्यात येणार असेल त्या प्रयोजनाच्या निकडीशी मिळत असेल तेथवर, मालकास व भोगवटदारांस वाजवी नोटीस देण्यात येईल आणि या शक्तीचा वापर शक्य असेल तेथवर, त्यांच्या किंवा त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत करण्यात येईल आणि मालकांच्या किंवा भोगवटदारांच्या सामाजिक व धार्मिक प्रथांची योग्य ती दखल घेण्यात येईल ;

(ब) ज्या कोणत्याही इमारतीची संरचनात्मक दुरुस्ती करण्याचे किंवा ती पुन्हा बांधण्याचे किंवा ती पाडण्याचे योजिले असेल अशी कोणतीही इमारत, तसे करणे आवश्यक वाटेल तर निर्दिष्ट केलेल्या मुदतीत रिकामी करविता येईल व त्यासाठी वाजवीरीत्या आवश्यक वाटतील अशा उपाययोजना करता येतील किंवा करविता येतील व अशा बलाचा वापर करता येईल किंवा करविता येईल.

(२) कोणत्याही इमारतीत किंवा जमिनीवर प्रवेश करण्यासाठी या कलमान्वये प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती प्रवेश करीत असताना किंवा अशी व्यक्ती आपले कर्तव्य किंवा तिला प्राधिकृत करण्यात आलेले किंवा तिला पार पाडणे आवश्यक असलेले कोणतेही काम पार पाडताना किंवा त्यांची बजावणी करताना जी कोणतीही व्यक्ती तिला अडथळा करील किंवा असा प्रवेश केल्यानंतर तिच्याशी कोणत्याही प्रकारे उपद्रवकारक वर्तणूक करील किंवा विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत कोणतीही इमारत रिकामी करण्यात किंवा तिच्यातील कोणत्याही मालकीच्या वस्तू हलविण्यात कसूर करील अशा व्यक्तीस दोषसिद्धीनंतर, पराकाष्ठा तीन महिने मुदतीची कारावासाची किंवा पराकाष्ठा पाचशे रुपये दंडाची किंवा या दोन्ही शिक्षा देण्यात येतील.

**इमारत दुरुस्ती, इमारत पुन्हा बांधणे आणि भोगवटदारांची निवास व्यवस्था व पुनर्वसन योजना हाती घेण्याची मंडळाची शक्ती.**

२३. (१) राज्य शासनास त्यास लादणे योग्य वाटतील अशा अटींवर व शर्तींवर, कोणतीही इमारत दुरुस्ती योजना, इमारत पुन्हा बांधण्याची योजना किंवा भोगवटदारांची निवासव्यवस्था व पुनर्वसन योजना---मग त्या या अधिनियमाद्वारे तरतूद केलेल्या असोत अथवा नसोत---तयार करण्याचे व त्यांची बजावणी करण्याचे काम मंडळाकडे सोपविता येईल आणि त्यानंतर मंडळ, या अधिनियमाद्वारे, तरतूद करण्यात आली असल्याप्रमाणे अशा योजना तयार करण्याचे व त्यांची बजावणी करण्याचे काम हाती घेईल.

(२) संमत करण्यात येतील अशा अटींवर व शर्तींवर आणि राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने, मंडळास---

(अ) आपल्या पर्यवेक्षणाधीन कोणत्याही इमारत दुरुस्ती योजनेची, इमारत पुन्हा बांधण्याच्या योजनेची किंवा बेघर भोगवटदारांच्या निवास व्यवस्थेच्या योजनेची बजावणी करण्याचे काम

मंडळास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ किंवा महानगरपालिका किंवा सहकारी संस्था किंवा मालकांचा किंवा भाडेकरूंचा संघ यांच्याकडे किंवा मंडळाकडून या प्रयोजनाकरिता मान्यता देण्यात आलेल्या इतर कोणत्याही अभिकरणाकडे सोपविता येईल ;

(ब) आणि प्रकरण ६ अन्वये संपादन केलेल्या कोणत्याही जमिनीवर बांधलेली कोणतीही नवीन इमारत, (सर्व भोगवटदारांनी) कोणतीही भाडेकरू सहभागीदारी गृहनिर्माण सहकारी संस्था बनविली असेल तर, तिच्याकडे हस्तांतरित करता येईल.

करार, दावे व कार्यवाही.

२४. (१) या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता, मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा याबाबतीत राज्य शासनाकडून प्राधिकृत करण्यात आलेला कोणताही इतर अधिकारी, लगत अनुवर्ती पोट-कलमांच्या उपबंधांस अधीन राहून, राज्य सरकारच्या वतीने कोणत्याही व्यक्तीबरोबर कोणताही करार करण्यास व त्याची बजावणी करण्यास सक्षम असेल.

(२) एक लक्ष रुपये किंवा त्याहून अधिक खर्च अंतर्भूत असलेला कोणताही करार, राज्य सरकारच्या पूर्व मंजुरीविना करता येणार नाही.

(३) पाच हजार रुपये किंवा त्याहून अधिक खर्च अंतर्भूत असलेला करार, पोट-कलम (२) ला अधीन राहून, मंडळाच्या पूर्व मंजुरीविना करता येणार नाही.

(४) पोट-कलमे (२) व (३) ही, मूळ करार किंवा अंदाज यांस तसेच एखाद्या करारातील किंवा अंदाजातील प्रत्येक तफावतीस किंवा त्याच्या परित्यागास, लागू होतील.

(५) प्रत्येक करार विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा नमुन्यात करण्यात येईल.

(६) शंका निरसनार्थ याद्वारे जाहीर करण्यात येते की,—

(अ) या कलमाअन्वये करण्यात आलेले सर्व करार हे, राज्याच्या कार्यकारी शक्तीचा वापर करून करण्यात आलेले करार असतील;

(ब) या अधिनियमाच्या अंमलबजावणीशी संबंधित सर्व दावे आणि कार्यवाह्या या राज्य शासनाकडून किंवा राज्य शासनाविरुद्ध करता येतील.

…न, …नगर- …ळका किंवा …निर्माण …ळ यांच्या- …न …हस्तां- करण्यात …ल्या किंवा …विण्यात …ल्या …मत्तेचा …:

२५. मंडळाने ज्या संमत केल्या असतील व राज्य शासनाने ज्यांना मान्यता दिली असेल अशा अटींवर व शर्तींवर, राज्य शासन, महानगरपालिका किंवा महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ यास, कोणतीही मालमत्ता—मग ती स्थावर किंवा जंगम असो—या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ मंडळाच्या वापरासाठी मंडळाकडे अभिहस्तांकित करता येईल किंवा सोपविता येईल. ज्या प्रयोजनांसाठी उक्त मालमत्ता अभिहस्तांकित किंवा सोपविण्यात आली असेल त्या प्रयोजनांसाठी तिचा वापर करणे हे मंडळाचे कर्तव्य असेल.

…ाच्या शक्ती.

२६. या अधिनियमाच्या आणि तदन्वये केलेल्या नियमांच्या व विनियमांच्या उपबंधांस अधीन राहून, मंडळास पुढील शक्तीसुद्धा असतील :—

(अ) राज्य सरकारच्या पूर्व मंजुरीने, कलम १३ अन्वये नेमलेल्या आपल्या समित्यांपैकी कोणत्याही समित्यांकडे किंवा अधिकाऱ्यांकडे, सर्वसाधारणपणे किंवा विशेषरीत्या, आपल्या शक्ती व कर्तव्ये यांपैकी कोणत्याही शक्ती व कर्तव्ये सोपविणे आणि विशिष्ट शक्ती व कर्तव्य त्यांच्या दुय्यम अधिकाऱ्यांकडे पुन्हा सोपविणे शक्य व्हावे म्हणून, त्यांना प्राधिकार देणे ;

(ब) मंडळाच्या शक्ती, कर्तव्ये व कामे यांच्या उचित बजावणीसाठी व ती पार पाडण्यासाठी आणि सामान्यतः या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ, आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा इतर गोष्टी करणे व अशी कामे पार पाडणे.

## प्रकरण ४

## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना उपकर निधी

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना उपकर बसविणे व तो गोळा करणे.

२७. (१) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, परंतु लगत अनुवर्ती कलमाच्या उपबंधास अधीन राहून, राज्य शासनाकडून शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियुक्त करण्यात येईल अशा तारखेपासून, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना उपकर म्हणून संबोधण्यात येणारा (या अधिनियमात "उपकर" म्हणून निर्दिष्ट केलेला) इमारती व जमिनी यांवरील कर, अधिनियमाच्या अनुसूची-अन्वये त्यासाठी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, संबंधित मालमत्तेच्या किंवा तिच्या भागाच्या करयोग्य मूल्याच्या शेकडा दराने बसविण्यात येईल व तो राज्य शासनास देण्यात येईल.

(२) या अधिनियमाच्या उपबंधास अधिन राहून, मुंबई महानगरपालिका अधिनियमान्वये मालमत्ता कर ज्या रीतीने गोळा करण्यात येत असेल त्याच रीतीने महानगरपालिकेकडून उपकर गोळा करण्यात येईल.

(३) आयुक्त, मुंबई महानगरपालिका अधिनियमान्वये बसविण्यात आलेल्या सामान्य करात भर टाकून पोट-कलम (१) अन्वये ठरविण्यात आलेली उपकराची रक्कम, वसूल करील. या कलमान्वये लादण्यात आलेली सामान्य करातील प्रत्येक भर ही, याकरिता पात्र असलेल्या प्रत्येक व्यक्तीकडून तिच्याकडून देय असलेला सामान्य कर ज्या रीतीने वसूल करण्यात येतो त्याच रीतीने आयुक्त वसूल करील. आयुक्तास, देय उपकरांच्या संबंधात तो ठरवील अशा मुदतीसाठी किंवा मुदतींसाठी अशा नमुन्यात किंवा नमुन्यांमध्ये वेगवेगळी बिले तयार करता येतील व तो ठरवील अशा रीतीने ती बजाविता येतील. उपकर प्रथमतः मालकाकडून वसूल करण्याजोगा असेल त्याबाबतीत कोणत्याही सहामाहीसाठी देय असलेला उपकराचा हप्ता पुढील सहामाहीसाठी देय असलेल्या सामान्य कराच्या हप्त्याबरोबर त्याचेकडून थकबाकी म्हणून वसूल करता येईल आणि अशा मालकास, पोट-कलम (४) अन्वये अनुज्ञा दिल्याप्रमाणे भाड्यात वाढ केलेली कोणतीही रक्कम कोणत्याही भोगवटदाराकडून, वसूल करणे शक्य नसेल त्याबाबतीत, त्यास, पोट-कलमे (५) व (६) ला अधीन राहून उक्त रक्कम भोगवटदाराकडून वसूल होईपर्यंत, ती देण्याचे रोखून ठेवण्याचा हक्क असेल. उक्त अधिनियमाची कलमे १४७ व १४८ चे उपबंध, असा उपकर त्या अधिनियमान्वये बसविण्यात आलेल्या सामान्य कराचा भाग असल्याप्रमाणे त्यास लागू होतील.

(४) एखाद्या मालकास, कोणत्याही मालमत्तेच्या संबंधात या कलमान्वये ठरविलेला व बसविलेला उपकर महानगरपालिकेला देण्यास फर्माविले असेल त्याबाबतीत मालकाचा हिस्सा मालमत्तेच्या करयोग्य मूल्याच्या १० टक्क्यांइतका असेल आणि त्याला सामान्य करात वाढ करण्यात आल्याप्रमाणे त्याच रीतीने इमारतीतील निरनिराळ्या जागांच्या भाड्यात प्रमाणशीर वाढ करून, बसविलेल्या उपकराची उरलेली रक्कम वसूल करण्याचा हक्क असेल; आणि अशी वाढ ही मुंबई भाडे नियंत्रण पथिकाश्रम व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७ याच्या कलम ७ च्या प्रयोजनासाठी किंवा मुंबईच्या महानगरपालिका अधिनियमाच्या प्रयोजनासाठी केलेली वाढ असल्याचे मानण्यात येणार नाही. कोणत्याही जागांचे भाडे दरमहा देय असेल त्या बाबतीत, अशा भाड्याची किंवा वाढीची सहा महिने किंवा अधिक मुदतीकरिता थकबाकी राहिली असेल तर; मालकाला मुंबई भाडे नियंत्रण पथिकाश्रम व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४ याचे कलम १२ अन्वये त्या जागांचा ताबा घेण्याचा अधिकार असेल.

(५) जर मालक,—

(अ) उपकरातील आपला हिस्सा महानगरपालिकेस देण्यास कसूर करील; किंवा

(ब) पोट-कलम (४) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे भोगवटदाराकडून देय असलेल्या उपकराचा कोणताही भाग, भोगवटदाराकडून वसूल करण्यात आल्यावर, महानगरपालिकेस देण्यास कसूर करील; किंवा

(क) त्याने जागांचा कब्जा परत मिळण्यासाठी वाजवी मुदतीत दावा दाखल केला नसेल किंवा भोगवटदाराकडून देय असलेल्या उपकराच्या भागाची सहा महिने किंवा त्याहून अधिक मुदतीसाठी त्याच्याकडून थकबाकी येणे असेल त्याप्रमाणे व तेव्हा भोगवटदाराचे नाव त्यांच्या कब्जात असलेल्या जागा व त्यांच्याकडून देय असलेल्या उपकराची रक्कम यासंबंधीचे प्रतिवृत्त आयुक्तास दिले नसेल ;

तर आयुक्तास, यथास्थिति, घर मालक किंवा भोगवटदार याचा किंवा या दोहोंचा उपकरातील हिस्सा मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या उपबंधाअन्वये मालमत्ता कराची थकबाकी ज्या रीतीने वसूल करण्यात येते त्याच रीतीने वसूल करण्याचा हक्क असेल.

**स्पष्टीकरण.**---या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, "वाजवी मुदत" म्हणजे, पोट-कलम (४) अन्वये भोगवटदाराने घरमालकास द्यावयाच्या उपकराच्या भागाची, ज्या तारखेस भोगवटदाराकडे सहा महिन्यांची थकबाकी असेल त्या तारखेपासून तीन महिन्यांची मुदत.

(६) निकटपूर्वीच्या पोट-कलमान्वये घर मालकाकडून प्रतिवृत्त मिळाल्यावर किंवा अन्यथा भोगवटदाराकडून देय असलेल्या उपकराच्या भागाची कोणत्याही भोगवटदाराकडे थकबाकी राहिली असेल तेव्हा आयुक्तास, देय रक्कम, (मग ती एक वर्षापेक्षा कमी किंवा अधिक मुदतीसाठी देय राहिलेली असो) जणू ती मुंबई महानगरपालिका अधिनियमान्वये देय असलेल्या कराची थकबाकी असल्याप्रमाणे भोगवटदाराकडून वसूल करता येईल.

(७) कोणत्याही विधीत काहीही अंतर्भूत केलेले असले तरी व कोणत्याही संविदेतून किंवा अन्यथा कोणत्याही तऱ्हेने कोणतेही अधिकार उद्भवलेले असले तरी, कोणत्याही जमिनीच्या किंवा इमारतीच्या संबंधात उपकर म्हणून देय असलेली कोणतीही रक्कम, राज्य शासनाला देय असलेला जमीन महसूल व शिक्षण उपकर आणि महाराष्ट्र शिक्षण (उपकर) अधिनियम, १९६२ अन्वये त्यावर बसविलेली शास्ती (कोणतीही असल्यास) अगोदर देण्यास अधीन राहून,---

(अ) शासनाकडून प्रत्यक्ष धारण केलेल्या कोणत्याही जमिनीच्या किंवा इमारतीच्या बाबतीत, असा उपकर देण्यास पात्र असलेल्या व्यक्तीच्या अशा जमिनीतील किंवा इमारतीतील हितसंबंधावर व अशा जमिनीत किंवा इमारतीत किंवा त्यावर आढळून आलेला व अशा व्यक्तीच्या मालकीचा माल व इतर जंगम मालमत्ता, कोणतीही असल्यास, त्यावर प्रथम भार असेल; आणि

(ब) कोणत्याही इतर जमिनीच्या किंवा इमारतीच्या बाबतीत अशा जमिनीवर किंवा इमारतीवर व अशा जमिनीत किंवा इमारतीत किंवा त्यावर आढळून आलेला व उपकर देण्यास पात्र असलेल्या व्यक्तीच्या मालकीचा माल व इतर जंगम मालमत्ता, कोणतीही असल्यास, त्यावर प्रथम भार असेल.

विवक्षित इमारतींना व जमिनींना उपकर देण्याची सूट.

२८. पुढील इमारतींना व जमिनींना उपकराची सूट देण्यात येईल :---

(अ) केंद्र शासनाकडे निहित असलेल्या इमारती व जमिनी;

(ब) राज्य शासनाकडे निहित असलेल्या किंवा राज्य शासनाने अधिग्रहीत केलेल्या इमारती व जमिनी, पण राज्य शासनाकडे निहित असलेली जमीन पट्ट्याने देण्यात आली असेल व त्यावर उभारलेली इमारत कोणत्याही इतर व्यक्तीच्या मालकीची असेल, तर अशा मालमत्ता वगळून;

(क) महानगरपालिकेकडे निहित असलेल्या इमारती व जमिनी, पण महानगरपालिकेकडे निहित असलेली जमीन पट्ट्याने देण्यात आली असेल व त्यावर उभारलेली इमारत कोणत्याही इतर व्यक्तीच्या मालकीची असेल, तर, अशा मालमत्ता वगळून;

(ड) महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाकडे निहित असलेल्या इमारती व जमिनी;

(इ) मुंबई बंदराच्या विश्वस्ताकडे निहित असलेल्या व लाभाच्या प्रयोजनासाठी वापरण्यात येत नसतील त्या किंवा वापरण्याचा हेतू नसलेल्या इमारती व जमिनी ;

(फ) मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदण्यात आलेल्या आणि सार्वजनिक पूजेच्या किंवा शैक्षणिक प्रयोजनासाठीच केवळ भोगवटचात असलेल्या इमारती व जमिनी किंवा त्याचे भाग ;

(ग) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदण्यात आलेल्या किंवा नोंदण्यात आल्याचे मानण्यात येणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या मालकीच्या इमारती व जमिनी;

(ह) मालकाच्याच केवळ भोगवटचात असलेल्या इमारती;

(आय) निवासेतर प्रयोजनासाठीच वापरात असलेल्या इमारती;

(जे) अनुमती आणि अनुज्ञप्ती तत्त्वावरच केवळ भोगवटचात असलेल्या निवासी इमारती;

(के) ज्यावर बांधकाम झाले नसेल अशा सर्व खुल्या जमिनी ;

(एल्) हा अधिनियम ज्या क्षेत्रात ज्या तारखेस अंमलात येईल त्या क्षेत्रात त्या तारखेनंतर उभारण्यात येतील अशा इमारती;

(एम्) इमारतींच्या दुरुस्तीसाठी उपलब्ध असेल अशी इतर कोणतीही योजना विचारात घेऊन, राज्य शासन, वेळोवेळी राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून आणि राज्य शासन लादील अशा शर्तींस अधीन राहून, ज्या कोणत्याही इतर इमारतींस किंवा इमारतींच्या वर्गास या बाबतीत सूट देईल अशा इमारती किंवा इमारतींचे वर्ग.

स्पष्टीकरण.—या कलमातील "इमारत" या संज्ञेचा अर्थ, इमारतीचा कोणताही भाग किंवा स्वतंत्रपणे घेण्यात आलेल्या तिच्यातील जागा नव्हे तर संपूर्ण इमारत असा समजावा.

२९. (१) या अधिनियमान्वये बसविता येण्याजोग्या उपकराची रक्कम निर्धारित करण्याच्या महानगर-
प्रयोजनार्थ आयुक्त, मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १५६ अन्वये त्याने ठेवलेल्या पालिका
आकारणी पुस्तकास जोडलेल्या अनुसूचीत (ती अशा आकारणी पुस्तकाचा एक भाग असल्याचे अधिनियमा-
मानण्यात येईल) जिच्यावर उपकर बसविता येईल अशी प्रत्येक मालमत्ता ज्या प्रवर्गाची असेल, त्वये
तो प्रवर्ग व त्यास आवश्यक वाटेल अशा इतर तपशील दर्शविणाऱ्या जादा नोंदी करण्याची व्यवस्था ठेवलेल्या
करील. कोणत्याही मालमत्तेत समाविष्ट असलेली इमारत दिनांक १ सप्टेंबर १९४०. पूर्वी उभार- आकारणी
ण्यात आलेली असेल त्याबाबतीत त्या मालमत्तेचे प्रवर्ग 'अ' मध्ये वर्गीकरण करण्यात आले पाहिजे. पुस्तकात
कोणत्याही मालमत्तेत समाविष्ट असलेली इमारत दिनांक १ सप्टेंबर १९४० ते दिनांक ३१ डिसेंबर उपकरास पा
१९५० (दोन्ही दिवस धरून) यामधील कालावधीत उभारण्यात आलेली असेल त्या बाबतीत असलेल्या
त्या मालमत्तेचे प्रवर्ग 'ब' मध्ये वर्गीकरण करण्यात आले पाहिजे. कोणत्याही मालमत्तेत समाविष्ट मालमत्ता
असलेली इमारत दिनांक १ जानेवारी १९५१ व ती इमारत ज्या क्षेत्रात असेल, त्या क्षेत्रात या ज्या प्रवर्ग
अधिनियमाचे उपबंध ज्या तारखेस अंमलात येतील त्या तारखेच्या लगतपूर्वीचा दिवस यामधील तील असतील
कालावधीत, उभारण्यात आलेली असेल त्याबाबतीत, त्या मालमत्तेचे प्रवर्ग 'क' मध्ये वर्गीकरण ते प्रवर्ग व
करण्यात आले पाहिजे. इमारतीचा एखादा मजला किंवा कोणताही भाग नंतर बांधण्यात येईल इतर तपशील
त्याबाबतीत, त्या मजल्याच्या किंवा भागाच्या बांधकामाची तारीख, क्षेत्रफळ व इतर तपशील वेगवेगळे यासंबंधीच्या
नोंदी असणे
दर्शविण्यात येतील.

(२) हा अधिनियम अंमलात येईल त्या तारखेस कोणत्याही क्षेत्रातील विद्यमान मालमत्तेच्या संबंधात प्रथमतःच जादा नोंदी करण्यात येत असतील तेव्हा, आयुक्त, मालमत्ता कर देण्यास मुख्यतः जबाबदार असेल अशा व्यक्तीस त्याबद्दल उक्त अधिनियमाच्या कलमे ४८३ ते ४८५-अ मध्ये दिलेल्या रीतीने व्यक्तीगत नोटीस देईल आणि तसेच, त्याबद्दल आणि अशा रीतीने सुधारण्यात आलेले प्रभागाचे आकारणी पुस्तक किंवा त्याची प्रत जेथे पाहता येईल त्या जागेबद्दल, कलम १६० मध्ये दिलेल्या रीतीने सार्वजनिक नोटीस देईल. जेव्हा पहिली सार्वजनिक नोटीस देण्यात

येईल तेव्हा आणि उक्त कलम १६० अन्वये तदनंतर अशी कोणतीही नोटीस देण्यात येईल तेव्हा उक्त अधिनियमाची कलमे १६१, १६२, १६३ व १६४ व कलम १६५ [या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ या कलमाच्या पोट-कलम (३) अन्वये फेरबदल केल्याप्रमाणे] चे उपबंध आणि कलमे १६६ व १६७ चे उपबंध, ज्याबद्दल आयुक्ताने नोटीस दिली आहे अशा आकारणी पुस्तकात नमूद केलेल्या करयोग्य मूल्याची रक्कम दर्शविणाऱ्या नोंदीस आणि कोणत्याही मालमत्तेसंबंधातील इतर नोंदीस ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे ते, शक्य तेथवर, अशा जादा नोंदीस लागू होतील.

(३) या कलमाच्या पोट-कलम (२) च्या प्रयोजनार्थ, मुंबई महानगरपालिका अधिनियमाचे कलम १६५, पोट-कलम (१) चे उपबंध लागू करताना, "आयुक्त" या शब्दाऐवजी, "महानगरपालिकेचा अभियंता आणि मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ अधिनियम, १९६९ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या मंडळाचा अभियंता यांच्याशी विचार विनिमय करून आयुक्त" हा मजकूर दाखल करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

गर- केने ाची र ाकडे करणे.

३०. (१) उपकर वसूल झाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांचे आत, अशा रीतीने वसूल करण्यात आलेली रक्कम, वेळोवेळी आयुक्ताकडून राज्य शासनास देण्यात येईल.

(२) महानगरपालिकेस, उपकर गोळा करण्याच्या खर्चादाखल, वसूल करण्यात आलेल्या उपकराच्या रकमेच्या पाच टक्के इतकी रक्कम बटाव म्हणून मिळण्याचा हक्क असेल; त्याबाबत महानगरपालिकेकडून, विहित केलेल्या रीतीने मागणी करण्यात येईल व तो तिला देण्यात येईल.

इमारत ी व ना.

३१. (१) निकटपूर्वीच्या कलमाच्या उपबंधांस अनुसरून महानगरपालिकेने वसूल केलेल्या व राज्य शासनास दिलेल्या उपकराचे उत्पन्न, प्रथमत: राज्याच्या एकत्रित निधीत जमा करण्यात येईल; आणि वसुलीच्या खर्चादाखल महानगरपालिकेस देय असलेल्या बटावाची रक्कम वजा केल्यानंतर, उर्वरित रक्कम, याबाबतीत विधिद्वारे, यथोचितरीत्या, करण्यात आलेल्या विनियोजनाअन्वये, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना निधी (या अधिनियमात ज्याचा "निधी" म्हणून निर्देश करण्यात आला आहे) या नावाने ओळखण्यात येणाऱ्या एका स्वतंत्र निधीत अंतर्भूत करण्यात व हस्तांतरित करण्यात येईल.

(२) निधीतील रक्कम, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ खर्च करण्यासाठी मंडळाकडे देण्यात येईल आणि अशा खात्यातील रकमेचा व्यवहार, मुख्य कार्यकारी अधिकारी व राज्य शासन विनिर्दिष्ट करील असा/असे राज्य शासनाचे अधिकारी यास करता येईल. राज्य शासनास, तो निधी ज्या रीतीने ठेवण्यात येईल, हाताळण्यात येईल व खर्च करण्यात येईल ती रीत धरून निधीशी संबंध असलेल्या इतर सर्व बाबींसंबंधी नियम करता येतील.

र वसूल ात तो त महा- ालिके- कसूर.

३२. (१) जर महानगरपालिका, उपकराच्या संबंधात देय असलेल्या कोणत्याही रकमा गोळा करण्यात किंवा त्या राज्य शासनास देण्यात कसूर करील तर, राज्य शासनास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, अशी रक्कम गोळा करण्यासाठी किंवा ती देण्यासाठी कालावधी निश्चित करता येईल.

(२) अशा रीतीने निश्चित करण्यात आलेल्या मुदतीत, रक्कम गोळा करण्यात किंवा देण्यात आली नाही तर राज्य शासनास, महानगरपालिकेकडे निहित असलेल्या निधीसंबंधी कोणत्याही विधीत किंवा त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधीत काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेचा कोणताही पैसा ज्या बँकेकडे ठेव म्हणून ठेवण्यात आला असेल त्या बँकेस किंवा महानगरपालिकेचा पैसा ज्या सरकारी कोषागारात किंवा इतर सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात येत असेल अशा इतर कोणत्याही ठिकाणाच्या प्रभारी व्यक्तीस, अशा बँकेत महानगरपालिकेच्या खात्यात जमा असलेली किंवा यथास्थिति अशा व्यक्तीजवळ असलेली किंवा महानगरपालिकेकडून किंवा तिच्या वतीने अशा बँकेस किंवा व्यक्तीस ठेव म्हणून, वेळोवेळी मिळालेली रक्कम, देण्याबद्दल निदेश देता येईल. आणि अशा बँकेस किंवा व्यक्तीस असा आदेश पाळणे बंधनकारक असेल.

(३) पोट-कलम (२) खालील आदेशास अनुसरून देण्यात आलेली प्रत्येक रक्कम, बँकेकडे किंवा व्यक्तीकडे अशा रीतीने ठेवलेल्या महानगरपालिकेच्या पैशातून उक्त बँकेने किंवा व्यक्तीने अशा रीतीने दिलेल्या कोणत्याही रकमेच्या संबंधातील महानगरपालिकेविषयीच्या आपल्या सर्व जबाबदारीतून अशा बँकेची किंवा व्यक्तीची पर्याप्त मुक्तता करील.

## प्रकरण ५

### मोडकळीस आलेल्या आणि कोसळण्याची शक्यता असलेल्या इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती आणि तात्पुरत्या व पर्यायी निवासव्यवस्थेची तरतूद

मोडकळीस आलेल्या आणि खचण्याची किंवा कोसळण्याची शक्यता असलेल्या इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती मंडळाने हाती घेणे.

३३. (१) या अधिनियमाच्या इतर उपबंधांना अधीन राहून, आयुक्ताने दिलेली माहिती किंवा त्या प्रयोजनार्थ प्राधिकृत केलेल्या त्याच्या अधिकाऱ्याचे प्रतिवेदन किंवा त्याच्या जवळ असलेली इतर माहिती विचारात घेतल्यावर मंडळाची अशी खात्री होईल की, ज्या इमारतीच्या बाबतीत उपकर बसविलेला आहे व ज्या इमारतीमध्ये व्यक्ती रहात असून ती मोडकळीस आलेली आहे किंवा जिची अवस्था धोकादायक आहे आणि जिच्यात त्वरित संरचनात्मक दुरुस्ती केली नाही तर ती लवकरच पडण्याची शक्यता आहे व ती दुरुस्त केल्यावर निवासास योग्य व सुरक्षित होईल, त्या बाबतीत, पोट-कलम (३) च्या उपबंधास अधीन राहून, मंडळ त्या इमारतीच्या अशा दुरुस्तीचे काम हाती घेईल.

(२) मंडळास, ज्या इमारतीच्या बाबतीत संरचनात्मक दुरुस्ती आवश्यक असेल अशा इमारतींची प्राथम्य किंवा निकड यांच्या क्रमाने एक यादी बनविता येईल आणि त्या प्रकरणाची निकड व आपली द्रव्यसाधने यानुसार संरचनात्मक दुरुस्त्या एकसमयावच्छेदेकरून किंवा अशा प्राथम्यक्रमानुसार हाती घेता येईल.

(३) कोणत्याही इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीचा खर्च दर चौरस मीटरास पंचाहत्तर रुपयांपेक्षा जास्त होईल असे मंडळाचे मत होईल तर मंडळ अशा इमारतीचा, दुरुस्तीसाठी विचार करणार नाही व तिच्या मालकाला तशा अर्थाचे प्रमाणपत्र देईल, अशा प्रमाणपत्राची एक प्रत इमारतीच्या एखाद्या दर्शनी भागात भोगवटदारांच्या माहितीसाठी लावील आणि प्रकरण सहामध्ये तरतूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्याच्या कामास लागेल.

परंतु, विशेष हालअपेष्टा संभवत असतील त्या बाबतीत अशा दुरुस्त्यांचा खर्च जरी उपरोक्त मर्यादेपेक्षा अधिक येण्याचा संभव असला तरीसुद्धा राज्य शासनाची पूर्वमंजुरी घेऊन मंडळास, (एखाद्या) इमारतीची संरचनात्मक दुरुस्ती करण्याचा विचार करता येईल.

(४) आयुक्त, ज्या इमारतीच्या बाबतीत उपकर बसविण्यात आला असेल आणि ज्या कोसळण्याच्या किंवा धोकादायक स्थितीत आहेत व संरचनात्मक दुरुस्त्यांचे काम तातडीने हाती घेतले नाही तर त्या कोसळण्याची फार शक्यता आहे अशी ज्यांची अवस्था असेल किंवा ज्या इमारतीच्या बाबतीत त्याने मुंबई महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३५४ अन्वये नोटिसा बजाविल्या असतील पण त्यांचे पालन करण्यात आले नसेल अशा इमारतींचा संपूर्ण तपशील वेळोवेळी मंडळाकडे पाठवील.

संरचनात्मक दुरुस्तीचे काम हाती घेण्यापूर्वीची कार्यपद्धती.

३४. (१) एखाद्या इमारतीस संरचनात्मक दुरुस्तीची आवश्यकता आहे अशी, लगत पूर्ववर्ती कलमात तरतूद केलेल्या रीतीने मंडळाची खात्री होईल त्याबाबतीत, मंडळ, तिच्या मालकाला पंधरा दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीची नोटीस देईल व या नोटीशीद्वारे जी (तारीख) नोटीस संपल्यानंतरची असेल अशा, नोटीशीत विनिर्दिष्ट करावयाच्या तारखेला व अशा तारखेपासून अशी दुरुस्ती करण्याचा मंडळाचा इरादा असल्याचे त्याला कळवील आणि नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या वेळेपूर्वी त्याविषयी त्याच्या कोणत्याही हरकती किंवा सूचना असल्यास त्या सादर करण्यास सांगेल. तसेच नोटीशीद्वारे, मालकाने स्वाक्षरी केलेले व त्याच्या कागदपत्रावरून त्यास माहीत

असलेल्या त्या इमारतीतील सर्व भोगवटदारांची नावे, प्रत्येक भोगवटदाराच्या ताब्यात असलेल्या जागेचे अंदाजे क्षेत्रफळ व ठिकाण आणि त्यासाठी आकारलेले भाडे किंवा भरपाई (कोणतीही अनुज्ञात वाढ धरून) नमूद केलेले लेखी विवरणपत्र मंडळाला सादर करण्याबद्दल मालकास फर्माविता येईल. अशा नोटीशीची एक प्रत ती ज्या इमारतीशी संबंधित असेल त्या इमारतीच्या एखाद्या ठळक भागावरसुद्धा लावण्यात येईल आणि त्या इमारतीच्या भोगवटदारांच्या माहितीसाठी व कोणत्याही हरकती किंवा सूचना असल्यास, त्या सादर करण्याची त्यांना संधी देण्यासाठी अशा इमारतीवर अथवा जवळपास घोषित करून व त्याबरोबरच दवंडी पिटवून जाहीर करण्यात येईल. अशा प्रकारे नोटीस लावल्यानंतर आणि जाहीर केल्यानंतर, मालक, भोगवटदार आणि संबंधित इतर सर्व व्यक्ती यांना तिच्यात उल्लेख केलेल्या बाबींसंबंधी यथोचितरीत्या माहिती देण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(२) मालक, भोगवटदार व इतर संबंधित व्यक्ती यांच्याकडून उपरोक्त वेळेच्या आत मिळालेल्या हरकती व सूचना विचारात घेतल्यानंतर, मंडळास, फेरफारासह किंवा फेरफाराशिवाय, दुरुस्ती करण्याचा निर्णय घेता येईल व दुरुस्तीच्या कामास सुरुवात करता येईल किंवा दुरुस्ती विवक्षित मुदतीसाठी स्थगित करता येईल अथवा दुरुस्ती करण्याचा इरादा रद्द करता येईल.

(३) इमारत लगेच धोकादायक होणार आहे असे मानण्यास मंडळाला संयुक्तिक कारण असेल त्या बाबतीत, नोटीस बजावल्यापासून २४ तासांच्या आत तिचे उत्तर मागता येईल.

(४) अशी कोणतीही नोटीस देण्यापूर्वी किंवा अशा कोणत्याही नोटिशीची मुदत संपण्यापूर्वी मंडळास, उक्त इमारतीस किंवा तिच्यापासून होणारा धोका टाळण्यासाठी त्यास योग्य वाटतील अशा उपाययोजना करता येतील.

(५) जो कोणताही मालक पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे विवरणे दाखल करण्यास नकार देईल किंवा कोणत्याही महत्त्वाच्या तपशीलाबाबत खोटे विवरण उद्देशपूर्वक पुरवील त्याला दोषसिद्धीनंतर पराकाष्ठा एक हजार रुपये दंडाची शिक्षा देण्यात येईल.

तात्पुरती निवास व्यवस्था.

३५. (१) जेव्हा मंडळ कोणत्याही इमारतीची संरचनात्मक दुरुस्ती हाती घेईल आणि दुरुस्ती पूर्ण होईपर्यंत तिच्या सर्व किंवा कोणत्याही भोगवटदारांनी आपल्या जागा तात्पुरत्या रिकाम्या केल्या पाहिजेत असे मंडळाचे मत असेल त्याबाबतीत, मंडळ, त्यांना विनिर्दिष्ट तारखेपर्यंत किंवा तारखांपर्यंत जागा रिकाम्या करण्याची नोटीस देईल व त्या प्रयोजनार्थ मंडळाने ठेवलेल्या इमारतीमध्ये त्यास योग्य वाटेल अशा ठिकाणी व अशा मर्यादेपर्यंत, अशा भोगवटदारांना तात्पुरती निवासस्थाने वाटून देईल. अशा निवासी जागा ह्या, भोगवटदारांनी रिकाम्या केलेल्या निवासी जागा ज्या वस्तीत असतील त्याच वस्तीत किंवा त्याच भुई क्षेत्रफळाच्या क्षेत्रफळाच्या असणे आवश्यक असणार नाही. कोणत्याही भोगवटदाराने निवासी जागा त्यास दिल्यापासून एक महिन्याच्या आत ती स्विकारली नाही व तिचा भोगवटा केला नाही तर त्याला निवासी जागा पुरविण्याची मंडळाची जबाबदारी संपुष्टात येईल. तथापि, नंतरच्या अनुवर्ती पोट-कलमांना अधीन राहून, अशा भोगवटदाराला, त्या इमारतीची दुरुस्ती करण्यात आल्यावर तिच्यातील आपल्या जागेचा पुन्हा ताबा घेण्याचा अधिकार असेल.

(२) अशी तात्पुरती निवास व्यवस्था, तिच्या वापराबद्दल व भोगवट्याबद्दल भोगवटदाराला कोणतीही भरपाई द्यावी न लागता, पण मंडळ वेळोवेळी ठरवील अशा इतर अटी व शर्ती यांस अधीन, उपलब्ध करून देण्यात येईल. एखाद्या भोगवटदाराने कोणतीही निवासी जागा स्वीकारली असेल त्याबाबतीत, भोगवटदाराने रिकाम्या केलेल्या जागेच्या संबंधातील भाडे (कोणतीही अनुज्ञात वाढ धरून) मालकाला देणे भोगवटदाराने चालू ठेवले पाहिजे. मंडळाने देऊ केलेली निवासी जागा एखाद्या भोगवटदाराने स्विकारली नसली तरीही अशा भोगवटदार, मालकाला योग्य नोटीस देऊन त्याने आपली वहिवाट किंवा इतर अधिकार सोडून दिलेले नसतील तर, त्याने रिकाम्या केलेल्या

जागेचे भाडे (कोणतीही अनुज्ञात वाढ धरून) मालकाला देण्याचे चालू ठेवण्यास पात्र असेल. तसेच भोगवटदार—मग त्याने निवासी जागा स्वीकारलेली असो किंवा आपली स्वत:ची व्यवस्था केली असो— त्याची वहिवाट चालू असेपर्यंत त्याने जागा तात्पुरती रिकामी केलेली नसल्याप्रमाणे उप-करातील त्याचे प्रमाणशीर अंशदान मालकाला देण्यास पात्र असेल व अशा रीतीने ते देण्यात कसूर करील तर तो सर्व परिणामास जबाबदार असेल.

(३) कोणत्याही भोगवटदाराने आपली जागा रिकामी केली नसेल त्या बाबतीत मंडळास, ती जागा रिकामी करून घेण्याच्या प्रयोजनार्थ वाजवीरीत्या आवश्यक असतील अशा उपाययोजना करता येतील किंवा करविता येतील आणि असा बलाचा वापर करता येईल किंवा करविता येईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये काढून टाकलेल्या व्यक्तींना पूर्ण पंधरा दिवसांची नोटीस दिल्या-नंतर व त्या इमारतीवर किंवा तिच्याजवळ कोणत्याही ठळक ठिकाणी तिची एक प्रत लावल्यानंतर मंडळाला, अशा इमारतीमध्ये राहिलेली कोणतीही मालमत्ता हलविता येईल अथवा हलविण्याची व्यवस्था करता येईल किंवा सार्वजनिक लिलावाद्वारे तिची विल्हेवाट लावता येईल.

(५) पोट-कलम (४) अन्वये मालमत्ता विकण्यात येईल त्या बाबतीत, विक्रीचा खर्च वजा केल्यानंतरचे विक्रीचे उत्पन्न ते मिळण्याचा हक्क असेल अशा व्यक्तीस किंवा व्यक्तींना देण्यात येईल :

परंतु, शिल्लक रक्कम कोणत्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना देय आहे याविषयी किंवा त्याच्या संविभाजनाविषयी निर्णय घेण्यास मंडळ असमर्थ असेल त्याबाबतीत, ते असा विवाद सक्षम अधि-कारिता असलेल्या दिवाणी न्यायालयाकडे निर्णयार्थ पाठवील आणि न्यायालयाचा निर्णय अंतिम असेल.

(६) संरचनात्मक दुरुस्ती पार पाडण्याचे काम पूर्ण होत आल्यावर किंवा पूर्ण झाल्यावर लवकरात लवकर मंडळ, ती इमारत विनिर्दिष्ट तारखेपासून पुन्हा भोगवटा करण्यासाठी तयार होण्याची शक्यता आहे किंवा तयार आहे व अशा तारखेपासून एक महिन्याच्या कालावधीत त्यांनी आपल्या जागांचा पुन्हा भोगवटा करावा, अशी नोटीस त्या इमारतीच्या कोणत्याही ठळक भागी चिकटवून व मंडळाकडे कोणत्याही भोगवटदाराने नोंदविलेल्या पत्त्यावर ती टपालाने पाठवून आणि विनियमात नमूद करण्यात येईल अशा इतर संबंधित भोगवटदारांना देईल. एखादा भोगवटदार विनिर्दिष्ट तारखेपासून एक महिन्याच्या कालावधीत आपल्या जागेचा पुन्हा भोगवटा करण्यात कसूर करील तर, कोणताही करार, किंवा मुंबई भाडे नियंत्रण, पथिकाश्रम व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७ किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला इतर कोणताही विधी यात काहीही अंतर्भूत असले तरी, उक्त जागेच्या संबंधातील त्याची वहिवाट किंवा इतर अधिकार समाप्त झाल्याचे मानण्यात येईल आणि मालकाला त्या जागेचा कब्जा घेण्याचा हक्क असेल. जर असा भोगवटदार तात्पुरती निवास व्यवस्था स्वीकारील तर त्याला ती जागा, ताबडतोब रिकामी करावी लागेल आणि त्याने ती रिकामी केली नाही तर, प्रकरण सात अन्वये अनधिकृत भोगवटा करणारी व्यक्ती म्हणून ती त्या जागेतून निष्कासित केली जाण्यास पात्र होईल.

ज्या इमारती एकाएकी कोसळतील किंवा राहण्यास अयोग्य होतील त्या इमारतींच्या दुरुस्त्या किंवा पुनर्रचना.

३६. (१) ज्या इमारतीच्या बाबतीत उपकर बसविला असेल अशी एखादी इमारत जेव्हां एकाएकी कोसळेल, किंवा आग, मुसळधार पाऊस किंवा इतर नैसर्गिक आपत्ती यामुळे राहाण्यास अयोग्य होईल आणि तिचे सर्व किंवा कोणतेही भोगवटदार बेघर होतील तेव्हां, मंडळ, त्याला योग्य वाटेल अशा ठिकाणी व अशा मर्यादेपर्यंत, मंडळाने त्या प्रयोजनार्थ ठेवलेल्या कोणत्याही इमारतीमध्ये अशा भोगवटदारांना तात्पुरती निवासी जागा देईल आणि लगत पूर्ववर्ती कलमाचे उपबंध संरचनात्मक दुरुस्त्या करण्यासाठी हाती घेतलेल्या इमारतींच्या भोगवटदारांच्या संबंधात जसे लागू होतात त्या-प्रमाणे ते योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

(२) अशी कोणतीही इमारत वाजवी खर्चाने दुरुस्त करून निवासासाठी योग्य करणे शक्य आहे असे मंडळाचे मत असेल तर, अशा इमारतीच्या बाबतीत, मंडळ आवश्यक त्या दुरुस्त्यांचे काम

ताबडतोब हाती घेईल आणि लगत पूर्ववर्ती कलम व या अधिनियमांचे इतर उपबंध संरचनात्मक दुरुस्त्यांना जसे लागू होतात त्याप्रमाणे ते योग्य त्या फेरफारांसह अशा दुरुस्त्यांना लागू होतील. जेव्हां संपूर्ण इमारत कोसळेल किंवा राहण्यास अयोग्य होईल किंवा इमारत वाजवी खर्चाने दुरुस्त करून निवासासाठी योग्य करणे शक्य नाही असे मंडळाचे मत असेल तेव्हां, मंडळ ती मालमत्ता प्रकरण ६ च्या उपबंधान्वये संपादन करण्यासाठी राज्य शासनास प्रचालित करील व बेघर झालेल्या भोगवटदारांना राहावयास जागा देण्यासाठी त्या जागेवर नवीन इमारत बांधण्याकरिता आवश्यक ती पुढील कार्यवाही करील. प्रकरण ६ चे उपबंध अशा इमारतीचे संपादन, पुनर्रचना व भोगवटदारांचे पुनर्वसन यांस योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

## प्रकरण ६

### दुरुस्ती न करता येण्याजोग्या इमारती संपादन करणे आणि इमारती पुन्हा बांधणे व भोगवटदारांचे पुनर्वसन करणे यासाठी योजना.

**कलमे ३६, ३८ आणि ३९ यांच्या प्रयोजनासाठी जमीन संपादन करण्याची शक्ती.**

३७. (१) कलमे ३६, ३८ व ३९ ची प्रयोजने पार पाडण्यासाठी राज्य सरकारला, आवश्यक असेल अशी कोणतीही जमीन खरेदी करणे, ती पट्ट्याने घेणे किंवा तिची अदलाबदल करणे यासाठी कोणत्याही व्यक्तीशी करार करता येईल.

(२) राज्य शासनास, उक्त प्रयोजने पार पाडण्यासाठी या प्रकरणाच्या उपबंधान्वये, भूमि संपादन अधिनियम, १८९४ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने कोणतीही जमीन सक्तीने सुद्धा संपादन करता येईल आणि उक्त प्रयोजनासाठी करण्यात आलेले जमिनीचे संपादन हे उक्त अधिनियमाच्या अर्थानुसार सार्वजनिक प्रयोजनासाठी करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

**जागा मोकळी करण्याची योजना तयार करणे.**

३८. (१) उपकर बसविण्यात आला असेल अशा कोणत्याही इमारतीच्या संबंधात, मंडळाने कलम ३३, पोट-कलम (३) अन्वये प्रमाणपत्र दिले असेल किंवा इमारतीपासून उद्भवणाऱ्या सर्व धोक्यास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने आयुक्ताने, मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३५४ अन्वये, उक्त इमारतीच्या मालकास किंवा भोगवटदारास ती पाडून टाकण्यास फर्माविणारी लेखी नोटीस दिली असेल आणि अशी इमारत वाजवी खर्च करून दुरुस्त करणे किंवा राहण्यासाठी योग्य करणे शक्य नाही आणि ती, निवास करणाऱ्या व्यक्तींच्या आरोग्यास किंवा सुरक्षिततेस धोकादायक किंवा हानिकारक आहे असे मंडळाचे मत होईल तर, किंवा अशी कोणतीही इमारत ज्या क्षेत्रात असेल ते क्षेत्र, महानगरपालिकेने, उक्त अधिनियमाच्या कलम ३५४-आर अन्वये, जागा मोकळी करण्याचे क्षेत्र म्हणून जाहीर करणारा ठराव संमत केला असेल त्याबाबतीत, मंडळास, ती इमारत पाडण ती जागा मोकळी करणे आणि त्याच जागेवर नवीन इमारत बांधणे यासाठी, योजनेचा खर्डा तयार करण्यास व तो मंडळाकडे सादर करण्यास महानगरपालिकेस फर्मावता येईल आणि उक्त अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी तरी महानगरपालिकेस अशी योजना तयार करून ती मंडळाकडे सादर करणे बंधनकारक असेल, आणि महानगरपालिकेकडून योजनेचा खर्डा मिळाल्यावर योजनेच्या प्रयोजनार्थ आवश्यक असतील असे नकाशे व अंदाज तयार करणे किंवा तयार करून घेणे हे मंडळाचे कर्तव्य असेल.

(२) इमारती नव्याने बांधण्याच्या योजनेचा खर्डा तयार करताना पाडून टाकावयाचे योजिलेल्या इमारतीतील सर्व भोगवटदारांची व्यवहार्य असेल तेथवर, नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीत निवासाची सोय होईल हे पहाणे आणि ज्या भोगवटदारांची अशा रीतीने निवासव्यवस्था होणे शक्य नसेल त्यांच्यासाठी मंडळाने अशा प्रयोजनार्थ ठेवलेल्या कोणत्याही इमारतीत पर्यायी निवासव्यवस्थेची तरतूद करणे मंडळाचे कर्तव्य असेल.

(३) मंडळ, विहित करण्यात येईल अशा इतर माहितीसमवेत, नकाशे व अंदाज यासह योजनेचा खर्डा मान्यतेसाठी व उक्त जमिनीवर कोणत्याही स्थितीत असलेल्या विद्यमान इमारतीसह जमीन संपादन करून ती मोकळी करण्यासाठी जागा मोकळी करणे व ती सक्तीने संपादन करणे यासंबंधीचा आदेश काढला जावा म्हणून राज्य शासनाकडे पाठवील.

(४) ज्या इमारतीवर उपकर बसविण्यात आला असेल त्या इमारतीच्या संबंधात, ती इमारत ज्या क्षेत्रात असेल त्या क्षेत्रात या अधिनियमाचे उपबंध ज्या तारखेस अंमलात आणण्यात आले त्या तारखेपूर्वी मुंबई महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३५४ अन्वये, त्या इमारतीपासून उद्‌भवणाऱ्या धोक्याच्या सर्व कारणांचा प्रतिबंध करण्यासाठी ती इमारत पाडून टाकण्यास सांगणारी लेखी नोटीस आयुक्ताने अगोदरच दिलेली असेल आणि अशा नोटीशीचे उपरोक्त तारखेपूर्वी अनुपालन करण्यात आले नसेल (त्याच्या आवाक्याबाहेरील कारणांखेरीज) तर, पोट-कलम (१) मध्ये कांहीही अंतर्भूत असले तरी, मंडळास, या प्रकरणाखाली मालमत्ता ताबडतोब संपादन करण्या-साठी राज्य शासनाला प्रचालित करता येईल आणि इमारत पाडण्यासाठी, जागा मोकळी करण्यासाठी व त्याच जागेवर नवीन इमारत बांधण्यासाठी आवश्यक त्या आणखी उपाययोजना करता येतील. या प्रकरणांतील उपबन्ध योग्य त्या फेरफारासह, अशा इमारतीतील भोगवटदारांची निवासव्यवस्था व्यवहार्य असेल तेथवर पुन: बांधलेल्या इमारतीत किंवा मंडळाने राखून ठेवलेल्या इतर कोणत्याही इमारतीत, मंडळ राज्य शासनाच्या पूर्वसंमतीने विनिर्दिष्ट करील अशा अटींस व शर्तींस अधीन राहून करण्यात येईल त्याखेरीज, इतर कोणत्याही इमारतीस ते जसे लागू होतात तसे अशा इमारतीच्या संपादनास, पुनर्रचनेस व अशा इमारतीतील भोगवटदारांच्या पुनर्वसनास लागू होतील.

३९. (१) मुंबई महानगरपालिका अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, लगत पूर्ववर्ती कलमाखालील योजनेचा मसुदा मिळाल्यावर आणि त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यावर किंवा माहिती मिळाल्यावर, योजना योग्य असल्याची आणि नवीन इमारत बांधण्यासाठी मंडळाकडे उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तिबाबत राज्य सरकारची खात्री होईल तर त्यास, योजनेच्या खर्चास जसा असेल त्याप्रमाणे किंवा राज्य सरकारला योग्य वाटतील अशा फेरफारासह, तात्पुरती मान्यता देता येईल.

जागा मोकळी करणे व ती सक्तीने संपादन करण याबाबत आदेश.

(२) राज्य सरकार, एकसमयावच्छेदेकरून, **शासकीय राजपत्रात** आणि बृहन्मुंबईत प्रसारात असलेल्या कमीत कमी चार वृत्तपत्रांत, एक नोटीस प्रसिद्ध करील आणि अशी योजना तयार करण्यात आली असून तिला तात्पुरती मान्यता देण्यात आलेली आहे आणि योजनेचा परिणाम झालेल्या भोगवटदारांसाठी संक्रमण शिबिरात पर्यायी निवासाची सोय करण्याचे योजिले आहे. या गोष्टी, आणि इमारत ज्यावेळी किंवा ज्या वेळेपूर्वी रिकामी केली पाहिजे ती वेळ त्यात नमूद करण्यात येईल.

(३) राज्य सरकार, पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली नोटीस, इमारतीचा मालक व भोगवटदार आणि अशा व्यक्तीबद्दल वाजवीरीत्या खात्री करून घेणे शक्य असेल तेथवर, इमारतीचा प्रत्येक गहाणदार याजवर बजावील आणि तीद्वारे योजनेच्या खर्चासंबंधी आणि अशी जमीन कां संपादण्यात येऊ नये यासंबंधी त्यांचे कोणतेही आक्षेप व सूचना असल्यास त्या नोटीशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेस किंवा त्यापूर्वी राज्य शासनास मिळतील अशा रीतीने सादर करण्यास फर्माविल.

(४) आक्षेप व सूचना यांवर विचार केल्यानंतर आणि या योजनेच्या खर्चाचा परिणाम झालेल्या व्यक्तींना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधि दिल्यावर, राज्य सरकारास, फेरफारासह किंवा फेरफाराशिवाय, योजनेचा खर्च मंजूर करता येईल, आणि मंजूर केल्याप्रमाणे योजना ज्या तारखेस अंमलात येईल ती तारीख निश्चित करता येईल आणि जागा मोकळी करणे आणि ती सक्तीने संपादन करणे याबाबतचा आदेश काढता येईल. जागा मोकळी करणे आणि ती सक्तीने संपादन करणे याबाबतचा आदेश राज्य सरकारकडून **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येईल आणि त्यात विनिर्दिष्ट करण्यात आलेली जमीन, नोटीस अशा रीतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या तारखेस व त्या तारखेपासून सर्व भारांपासून मुक्त अवस्थेत राज्य सरकारकडे पूर्णपणे निहित होईल.

(५) पोट-कलम (४) अन्वये, काढण्यात व प्रसिद्ध करण्यात आलेल्या, जमीन मोकळी करणे व ती सक्तीने संपादन करणे याबाबतच्या आदेशामुळे जिल्हाधिकाऱ्यास, जमिनीचा कब्जा असलेल्या

२८)



व्यक्तीस विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मुदतीत तिचा कब्जा प्रत्यर्पित करण्याबद्दल किंवा ती स्वाधीन करण्याबद्दल नोटीस देण्यास आणि तसे करण्यास नकार दिल्यास किंवा कसूर केल्यास, जमिनीचा कब्जा घेण्यास व त्या प्रयोजनासाठी आवश्यक असेल त्याप्रमाणे बलाचा वापर करण्यास आणि तिचा कब्जा मंडळाचे हवाली करण्यास आणि मंडळास, निकटतम अनुवर्ती पोट-कलमानुसार इमारत रिकामी करण्यासाठी पुढील कार्यवाही करण्यास पुरेसा प्राधिकार मिळेल. जमिनीत हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, भरपाई निश्चित करण्यात किंवा देण्यात आली नाही याच केवळ कारणावरून असा कब्जा घेण्याबाबत किंवा इमारत रिकामी करण्याबाबत आक्षेप घेण्याचा अधिकार असणार नाही.

(६) योजना अंमलात आल्यावर इमारतीचे भोगवटदार, योजनेअन्वये त्या प्रयोजनासाठी देण्यात आलेल्या मुदतीत, आपल्या जागा रिकाम्या करतील.

(७) पोट-कलम (६) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली मुदत संपल्यावर, इमारत किंवा इमारतीचा जो भाग भोगवटयात असण्याचे चालू राहिले असेल तो भाग रिकामा करण्याच्या प्रयोजनार्थ, मंडळ, त्यांच्या मते उक्त प्रयोजनार्थ वाजवी अशा उपाययोजना करील किंवा करवील व अशा बलाचा वापर करील किंवा वापर करवील.

(८) पोट-कलम (७) अन्वये निष्कासित केलेल्या व्यक्तीस, विहित करण्यात आलेल्या रीतीने पूर्ण सात दिवसांची नोटीस दिल्यानंतर, मंडळास अशा इमारतीत राहिलेली कोणतीही मालमत्ता हलविता येईल किंवा हलविण्याची व्यवस्था करता येईल किंवा जाहीर लिलावाद्वारे तिची विल्हेवाट लावता येईल.

(९) पोट-कलम (८) अन्वये मालमत्ता विकण्यात येईल त्याबाबतीत विक्रीचा खर्च वजा केल्यानंतर राहिलेले विक्रीचे उत्पन्न, ते मिळण्याचा ज्यांना हक्क आहे असे मंडळास दिसून येईल त्या व्यक्तीस/व्यक्तींना देण्यात येईल :

परंतु, शिल्लक रक्कम कोणत्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना देय आहे याबद्दल किंवा उक्त रकमेच्या संविभाजनाबद्दल निर्णय घेण्यास मंडळ असमर्थ असेल त्याबाबतीत ते असा विवाद, सक्षम अधिकारिता असलेल्या दिवाणी न्यायालयाकडे निर्णयार्थ पाठवील आणि न्यायालयाचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

(१०) इमारत संपूर्णपणे रिकामी केल्यानंतर मंडळ, त्या जागेवर योजनेनुसार नवीन इमारत बांधण्यास सुरुवात करील.

मि संपादन अधिनियमानुसार भरपाई इतर ...येपद्धती.

४०. (१) या प्रकरणान्वये कोणतीही जमीन संपादन करण्यात येऊन ती राज्य शासनाकडे निहित करण्यात येईल त्या बाबतीत राज्य शासन, [या कलमाच्या उपबंधानुसार ठरविण्यात येईल अशी भरपाईची रक्कम अशा संपादनार्थ भरपाई म्हणून देईल.]

(२) राज्य सरकार आणि जिला भरपाई द्यावयाची असेल ती व्यक्ती यांच्यामध्ये झालेल्या कराराद्वारे भरपाई रक्कम निश्चित करण्यात आली असेल त्या बाबतीत ती अशा करारानुसार ठरविण्यात येईल.

(३) असा कोणताही करार करणे शक्य झाले नसेल त्या बाबतीत, राज्य सरकार ते प्रकरण जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवील व तो भूमि संपादन अधिनियम, १८९४ मध्ये भरपाई ठरविण्यासाठी घालून दिलेल्या तत्त्वानुसार भरपाई ठरवील आणि कलम ४, पोट-कलम (१) खालील अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेसंबंधातील उक्त अधिनियमाची कलमे २३ व २४ मधील निर्देश, हे या अधिनियमाचे कलम ३९, पोट-कलम (२) अन्वये ज्या तारखेस नोटीस शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येईल त्या तारखेसंबंधीचे निर्देश आहेत आणि कलम ६ खालील घोषणेच्या प्रसिद्धीची वेळ किंवा दिनांक या संबंधीचे निर्देश हे या अधिनियमाचे कलम ३९, पोट-कलम (४) खालील जागा मोकळी करणे आणि ती सक्तीने संपादन करणे याबाबतचा आदेश शासकीय राजपत्रात ज्या

तारखेस प्रसिद्ध करण्यात येईल त्या तारखेसंबंधीचे निर्देश आहेत या फेरबदलास अधीन राहून, त्या अधिनियमाचे उपबंध (न्यायालयाकडे निर्देश करणे आणि अपील यासंबंधीचे उपबंध धरून) त्या अधिनियमाच्या उपबंधांन्वये जमीन संपादन करण्यात आली असल्याप्रमाणे व त्याबद्दल भरपाई निश्चित करावयाची, तिचे संविभाजन करावयाचे व ती द्यावयाची असल्याप्रमाणे, त्याबाबत योग्य त्या फेरफारासह लागू होतील.

## प्रकरण ७

### मंडळाच्या जागांमधून व्यक्तींचे निष्कासन करण्याकरिता व देणे वसूल करण्याकरिता विशेष उपबंध.

४१. राज्य शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्याच्या मते, उप-जिल्हाधिकारी किंवा दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठस्तर) यांच्या दर्जाहून कमी दर्जाचे नसेल असे पद जो धारण करीत असेल किंवा ज्यांनी धारण केले असेल अशा अधिकाऱ्याची सक्षम प्राधिकारी म्हणून अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रात किंवा कोणत्याही क्षेत्रातील, अशा जागांच्या किंवा जागांच्या वर्गांच्या संबंधात या प्रकरणाखालील अशा प्राधिकाऱ्याची कामे पार पाडण्याकरिता नेमणूक करता येईल आणि एकाच क्षेत्रातील वेगवेगळ्या जागांच्या किंवा जागांच्या वेगवेगळ्या वर्गांच्या संबंधात एकापेक्षा अधिक अधिकाऱ्यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नेमणूक करता येईल. सक्षम प्राधिकाऱ्याची नेमणूक.

४२. (१) (अ) मंडळाची कोणतीही जागा ताब्यात घेण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तीने— मंडळाच्या जागांमधून विशिष्ट व्यक्तींचे निष्कासन करण्याची शक्ती.

(एक) अशा जागांच्या संबंधात त्यांच्याकडून तीन महिन्यांपेक्षा अधिक मुदतीसाठी वैधरीत्या देय असलेले भाडे किंवा भरपाई दिलेली नाही, किंवा

(दोन) मंडळाच्या पूर्वपरवानगीशिवाय अशी सर्व जागा किंवा तिचा कोणताही भाग पोट-भाड्याने दिलेला आहे, किंवा

(तीन) अशा जागांना विनाशक होणारे किंवा कायमचे हानिकारक होणारे कोणतेही कृत्य केलेले आहे किंवा करीत आहे, किंवा

(चार) मंडळाच्या पूर्वपरवानगीशिवाय अशा जागेमध्ये महत्त्वाची भर घातलेली आहे किंवा घालीत आहे अथवा फेरफार केलेले आहेत किंवा करीत आहे, किंवा

(पाच) ज्या अटींअन्वये अशी जागा ताब्यात घेण्यास त्यास प्राधिकृत करण्यात आले असेल त्या अटींपैकी कोणत्याही स्पष्ट किंवा गर्भित अटींचे उल्लंघन करून अन्य प्रकारे वर्तन केलेले आहे; किंवा

(ब) मंडळाची कोणतीही जागा कोणत्याही व्यक्तीच्या अनधिकृतरीत्या ताब्यात आहे,

अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री होईल तर सक्षम प्राधिकारी, लेखी नमूद करावयाच्या कारणांस्तव (एक) टपालाद्वारे, किंवा (दोन) अशा जागेच्या बाहेरील दरवाजावर किंवा कोणत्याही इतर दर्शनी भागावर नोटिशीची एक प्रत चिकटवून, किंवा (तीन) विहित करण्यात येईल अशा कोणत्याही इतर पद्धतीने नोटीस बजावून असा आदेश देऊ शकेल की, ती व्यक्ती, त्याचप्रमाणे अशी सर्व जागा किंवा तिचा कोणताही भाग ताब्यात असेल अशी कोणतीही इतर व्यक्ती नोटीस बजावल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत ती जागा रिकामी करील.

(२) पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही व्यक्तीविरुद्ध आदेश देण्यापूर्वी जागांतून निष्कासन करण्याविषयीचा आदेश का देण्यात येऊ नये यासाठी पंधरा दिवसांच्या आत कारण दर्शविण्याबद्दल सर्व संबंधित व्यक्तींना फर्माविणारी लेखी नोटीस सक्षम अधिकारी यापुढे तरतूद केलेल्या रीतीने देईल.

(अ) अशा नोटिशीत, ज्या कारणांकरिता निष्कासन करण्याविषयी आदेश देण्याचे योजिले आहे ती कारणे निर्दिष्ट करण्यात आली पाहिजेत, आणि

(ब) अशा नोटिशीद्वारे, सर्व संबंधित व्यक्तींना म्हणजे मंडळाच्या जागा ज्यांच्या ताब्यात आहेत किंवा ज्यांच्या ताब्यात असतील किंवा अशा जागेत हितसंबंध असल्याचा ज्यांचा दावा असेल अशा सर्व व्यक्तींना नोटिशीत निर्दिष्ट करण्यात आली असेल अशा तारखेस किंवा तत्पूर्वी प्रस्तावित आदेशाविरुद्ध कारण फर्माविण्यात सांगण्यात आले पाहिजे.

अशी व्यक्ती नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीत वाढ करण्याकरिता सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज करील, तर असा प्राधिकारी नोटिशीत मागणी करण्यात आली असेल अशी रक्कम देण्याविषयी किंवा वसूल करण्याविषयी त्याला योग्य वाटतील अशा शर्तींवर तो अर्ज मंजूर करू शकेल.

नोटिशीच्या अनुरोधाने कोणत्याही व्यक्तीने सादर केलेले कोणतेही लेखी निवेदन किंवा दाखल केलेले दस्तऐवज, प्रकरणाच्या अभिलेखासोबत फाईल करण्यात येतील आणि अशा व्यक्तीस अधिवक्ता, न्यायप्रतिनिधी किंवा इतर विधीव्यवसायी यांच्याद्वारा अशा सक्षम प्राधिकाऱ्यापुढे उपस्थित राहण्याचा हक्क असेल.

या पोट-कलमान्वये बजावण्यात येणारी नोटीस पोट-कलम (१) अन्वये नोटीस बजावण्याकरिता तरतूद करण्यात आलेल्या रीतीने बजावण्यात येईल आणि त्यानंतर ती नोटीस सर्व संबंधित व्यक्तींना यथोचितरीत्या देण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

(३) कोणतीही व्यक्ती पोट-कलम (१) अन्वये देण्यात आलेल्या आदेशाचे अनुपालन करण्याचे नाकारील किंवा अनुपालन करण्यात कसूर करील तर, सक्षम प्राधिकारी, त्या व्यक्तीला किंवा त्याला अडथळा करील अशा कोणत्याही इतर व्यक्तीला निष्कासित करू शकेल आणि ती जागा ताब्यात घेऊ शकेल; आणि त्यास त्या प्रयोजनाकरिता आवश्यक असेल अशा बळाचा वापर करता येईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये ज्या व्यक्तीकडून मंडळाच्या जागेचा ताबा घेण्यात आला असेल त्या व्यक्तीला चौदा पूर्ण दिवसांची नोटीस दिल्यानंतर आणि अशी नोटीस विहित रीतीने प्रसिद्ध केल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्यास, अशा जागेत राहिलेली कोणतीही मालमत्ता हलविता येईल किंवा हलविण्याची व्यवस्था करता येईल किंवा सार्वजनिक लिलावाद्वारे तिची विल्हेवाट लावता येईल. अशी नोटीस पोट-कलम (१) अन्वये नोटीस बजावण्याकरिता तरतूद करण्यात आलेल्या रीतीने बजावण्यात आली पाहिजे.

(५) पोट-कलम (४) अन्वये मालमत्ता विकण्यात आली असेल त्या बाबतीत विक्रीचा खर्च वजा केल्यानंतर, विक्री उत्पन्न ज्या व्यक्तीचा किंवा ज्या व्यक्तींचा त्यावर हक्क आहे असे सक्षम प्राधिकाऱ्याला वाटेल अशा व्यक्तीला किंवा व्यक्तींना देण्यात येईल:

परंतु, सक्षम प्राधिकारी शिल्लक रक्कम ज्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना देय असेल ती व्यक्ती किंवा त्या व्यक्ती ठरवू शकत नसेल किंवा तिचे संविभाजन करणे त्याला शक्य नसेल त्या बाबतीत तो असा विवाद, सक्षम अधिकारिता असलेल्या दिवाणी न्यायालयाकडे निर्णयार्थ पाठवील आणि त्यावरील न्यायालयाचा निर्णय अंतिम असेल.

(६) पोट-कलम (१), खंड (अ), उप-खंड (एक) किंवा (पाच) अन्वये कोणतीही जागा खाली करण्याचा आदेश जिला देण्यात आला आहे अशी व्यक्ती नोटीस बजावल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत किंवा सक्षम प्राधिकारी परवानगी देईल अशा अधिक मुदतीत जर भाड्याची किंवा भरपाईची थकबाकी अशा प्राधिकाऱ्याला देईल किंवा तिने उल्लंघन केलेल्या अटी अशा प्राधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने पुऱ्या करील किंवा अन्यथा त्यांचे पालन करील तर असा प्राधिकारी (उपरोक्त उल्लंघनाबद्दल हानी किंवा भरपाई या मार्गाने द्यावयाची कोणतीही रक्कम धरून) कोणत्याही अटी असतील तर, त्या अटींवर, पोट-कलम (३) अन्वये अशा व्यक्तीचे

निष्कासन करण्याऐवजी पोट-कलम (१) अन्वये देण्यात आलेला त्याचा आदेश रद्द करील आणि त्यानंतर अशी व्यक्ती तिच्यावर अशी नोटीस बजावण्याच्या लगतपूर्वी ज्या अटींवर तिने जागा धारण केली होती त्याच अटींवर जागा धारण करण्याचे चालू ठेवील.

**स्पष्टीकरण.**—ह्या कलमाच्या आणि पुढील अनुवर्ती कलमाच्या प्रयोजनाकरिता मंडळाची कोणतीही जागा ताब्यात घेण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीसंबंधात "अनधिकृत भोगवटा" या शब्दप्रयोगामध्ये ज्या प्राधिकारान्वये जागेचा ताबा घेण्यास त्यास अनुमती देण्यात आली होती त्या प्राधिकाराच्या समाप्तीनंतर किंवा तो यथोचितरित्या संपुष्टात आणण्यात आल्यानंतर त्याने किंवा त्याच्यामार्फत किंवा अधीन दावा सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने अशा जागेचा भोगवटा चालू ठेवणे यांचाही समावेश होतो.

**भाडे भरपाई किंवा नुकसान-भरपाई जमीन महसुलाच्या थकबाकी-प्रमाणे वसूल करण्याची शक्ती.**

४३. (१) ह्या बाबतीत राज्य सरकारने केलेल्या कोणत्याही नियमांना अधीन, परंतु निकट पूर्ववर्ती कलमाच्या उपबंधांना हानी न पोचविता मंडळाच्या कोणत्याही जागेच्या संबंधात देय असलेले भाडे किंवा भरपाई यांची कोणत्याही व्यक्तीकडे बाकी असेल त्याबाबतीत सक्षम प्राधिकारी निकट पूर्ववर्ती कलमाच्या पोट-कलम (१) अन्वये नोटीस बजावण्याकरिता तरतूद करण्यात आलेल्या रीतीने नोटीस बजावून त्या नोटिशीत निर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे दहा दिवसांपेक्षा कमी नसेल अशा वेळेच्या आत ती भरण्याबद्दल त्या व्यक्तीला आदेश देऊ शकेल.

(२) कोणतीही व्यक्ती मंडळाच्या कोणत्याही जागेचा अनधिकृत भोगवटा करीत असेल त्याबाबतीत सक्षम प्राधिकाऱ्यास, नियमाद्वारे तरतूद करण्यात येईल अशा रीतीने आणि नुकसानभरपाई निर्धारीत करण्याची तत्वे लक्षात घेऊन, अशा जागेच्या वापराबद्दल व भोगवटाबद्दल त्याला योग्य वाटेल अशी नुकसानभरपाई आकारता येईल आणि पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या रीतीने नोटीस बजावून त्या नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वेळेच्या आत नुकसानभरपाई भरण्याबद्दल त्या व्यक्तीला आदेश देता येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये आदेश का देण्यात येऊ नये या विषयी पंधरा दिवसांच्या आत कारण दर्शविल्याबद्दल त्या व्यक्तीला फर्माविणारी लेखी नोटीस त्यास पाठविण्यात येईपर्यंत आणि त्याच्या हरकती, कोणत्याही असल्यास त्या व त्यांच्या पुष्टयर्थ तो सादर करील असा कोणताही पुरावा सक्षम प्राधिकाऱ्याकडून विचारात घेण्यात येईपर्यंत असा आदेश देण्यात येणार नाही.

**सक्षम प्राधिकाऱ्याला दिवाणी न्यायालयाच्या शक्ती असणे.**

४४. एखाद्या दाव्याची न्याय चौकशी करताना, दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयाकडे ज्या शक्ती निहित केलेल्या असतात त्याच शक्ती, पुढील बाबींच्या संबंधात ह्या प्रकरणान्वये कोणतीही चौकशी करण्याच्या प्रयोजनार्थ सक्षम प्राधिकाऱ्याला असतील—

(अ) कोणत्याही व्यक्तीला बोलाविणे व तिला हजर राहाण्यास भाग पाडणे आणि तिची शपथेवर तपासणी करणे,

(ब) कागदपत्र शोधून काढून ते सादर करण्यास फर्माविणे,

(क) विहित करण्यात येईल अशी कोणतीही इतर बाब.

**अपिले.**

४५. (१) मंडळाच्या कोणत्याही जागेच्या संबंधात कलम ४२ किंवा कलम ४३ अन्वये देण्यात आलेल्या समक्ष प्राधिकाऱ्याच्या प्रत्येक आदेशावर अपील अधिकाऱ्याकडे अपील करता येईल. असा अधिकारी राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे त्या प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट करील असा, न्यायिक अनुभव असलेला किंवा राज्याच्या विधि विभागातील अनुभव असलेला शासन उपसचिवाच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल असा असेल.

(२) पोट-कलम (१) खालील अपील :—

(अ) कलम ४२ खालील आदेशावरील अपिलाच्या बाबतीत त्या कलमाच्या पोट-कलम (१) खालील आदेशाशी संबंधित नोटीस बजावल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत करण्यात येईल, आणि

(ब) कलम ४३ खालील आदेशावरील अपिलाच्या बाबतीतील कलमाच्या पोट-कलम (१) किंवा यथास्थिति (२) खालील आदेशाशी संबंधित नोटीस बजावल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत करण्यात येईल :

परंतु, अपिलकर्त्यास, वेळेच्या आत अपील दाखल करण्यास पुरेशा कारणामुळे प्रतिबंध झाला होता अशी अपील अधिकाऱ्याची खात्री झाली असेल तर त्यास, तीस दिवसांचा उक्त कालावधी संपल्यानंतर अपील दाखल करून घेता येईल.

(३) सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशावर अपील दाखल करण्यात येईल त्याबाबतीत अपील अधिकारी त्याला योग्य वाटेल अशा कालावधीकरिता आणि अशा शर्तीवर या आदेशाची अंमलबजावणी थोपवू शकेल.

(४) या कलमाखालील प्रत्येक अपील, अपील अधिकारी शक्य तितक्या शीघ्रतेने निकालात काढील.

**दिवाणी न्यायालयाच्या अधिकारितेस प्रतिबंध.**

४६. कोणत्याही दिवाणी न्यायालयास, या प्रकरणान्वये मंडळाच्या कोणत्याही जागांमधून कोणत्याही व्यक्तीस निष्कासित केल्याच्या संबंधातील किंवा अशा जागांचा वापर व भोगवटा केल्याबद्दलच्या भाड्याची थकबाकी, भरपाई किंवा हानि याच्या वसुली संबंधातील किंवा या प्रकरणान्वये किंवा तदन्वये प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही शक्तीचा वापर करून, सक्षम प्राधिकाऱ्याने किंवा अपील अधिकाऱ्याने, दिलेला किंवा द्यावयाचा कोणताही आदेश किंवा केलेली किंवा करावयाची कोणतीही कार्यवाही या संबंधातील कोणताही दावा किंवा कारवाई दाखल करून घेण्याची किंवा असा आदेश किंवा कार्यवाही यासंबंधात कोणतीहा निषेधाज्ञा मंजूर करण्याची अधिकारिता असणार नाही.

**या प्रकरणाखालील शक्तींच्या वैध वापरास अडथळा केल्याबद्दल शास्ती.**

४७. या प्रकरणाद्वारे किंवा तदन्वये प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही शक्तींच्या वैध वापरास अडथळा करील अशा कोणत्याही व्यक्तीस दोषसिद्धीनंतर पराकाष्ठा एक हजार रुपये दंडाची शिक्षा होईल.

## प्रकरण ८

### वित्तव्यवस्था, लेखे, लेखापरीक्षा व वार्षिक अहवाल

**प्रारंभिक खर्चासाठी कर्ज.**

४८. मंडळाची स्थापना करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य शासन व महानगरपालिका यापैकी प्रत्येक प्रारंभिक खर्च भागविण्यासाठी, यथास्थिति, ते शासन किंवा महानगरपालिका ठरवील अशी ५० लक्ष रुपयांहून अधिक नसणारी रक्कम कर्ज म्हणून मंडळास देऊ शकेल. अशाप्रकारे कर्ज म्हणून दिलेली रक्कम मंडळाच्या निधीमध्ये जमा करण्यात येईल.

**मंडळास मिळालेल्या पैशाची विल्हेवाट.**

४९. (१) भाडे भरपाई, नुकसान भरपाई व व्याज यांच्या रूपाने आणि अनुदाने, अर्थसहाय्य किंवा अन्यथा कोणत्याही तऱ्हेने मंडळास मिळालेल्या सर्व रकमा प्रथम राज्याच्या एकत्रित निधीत जमा करण्यात येतील व त्यानंतर विधीद्वारे यासंबंधी केलेल्या यथोचित विनियोजनाखाली त्या मंडळाच्या निधीमध्ये दाखल व हस्तांतरित केल्या जातील. राज्य शासन त्याला आवश्यक वाटतील अशा रकमा, अनुदाने, अर्थसहाय्य किंवा अन्यप्रकारे, वेळोवेळी निधीमध्ये हस्तांतरित करू शकेल.

(२) याबाबतीत यथोचितरित्या केलेल्या विनियोजनान्वये राज्य शासन मंडळाला एक कोटी रुपये वार्षिक अनुदान म्हणून देऊ शकेल व महानगरपालिकेने एक कोटी रुपये इतकी रक्कम वार्षिक अनुदान म्हणून दिली पाहिजे.

(३) तसेच, या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी मंडळास शासन, महानगरपालिका, महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ किंवा कोणतीही व्यक्ती किंवा संस्था—मग ती निगमित असो वा नसो—यांच्याकडून अनुदानें, अर्थसहाय्य, दाने व देणग्या स्वीकारता येतील.

(४) मंडळाच्या स्वाधीन केलेल्या पैशांचा विनियोग या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी म्हणजेच पुढील खर्च भागविण्यासाठी करण्यात येईल.

(अ) इमारतींच्या दुरुस्त्या, इमारती पुन्हा बांधणे व बेघर भोगवटदारांचे पुनर्वसन आणि त्याच्याशी संबंधित किंवा आनुषंगिक असतील अशा बाबी यांच्या संबंधातील सर्व खर्च ;

(ब) कलमें ५, १६ व २० यामध्ये निर्दिष्ट केलेले खच ;

(क) जमीन संपादनाचा खर्च ;

(ड) या अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी करावा लागेल असा इतर कोणताही खर्च ; आणि

(इ) राज्य शासन निदेश देईल अशा इतर प्रयोजनासाठीचा खर्च;

(५) निधीमधील विहित करण्यात येईल इतकी रक्कम, मंडळ स्टेट बँक ऑफ इंडिया किंवा राज्य शासनाने यासंबंधी मान्यता दिलेल्या इतर कोणत्याही बँकेच्या चालू किंवा ठेवीच्या खात्यामध्ये ठेवील आणि उक्त रकमेपेक्षां अधिक असतील असे कोणतेही पैसे राज्य शासन मान्यता देईल अशा रीतीने गुंतविण्यात येतील.

(६) अशा खात्यातील व्यवहार मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा मुख्य लेखा अधिकारी किंवा यासंबंधात केलेल्या विनिमयाद्वारे त्याने प्राधिकृत केला असा/असे मंडळाचा/चे इतर अधिकारी करील/करतील.

**अर्थसंकल्प व कामाचा कार्यक्रम.**

५०. (१) विहित करण्यात येईल अशा नमुन्यामध्ये व प्रत्येक वर्षातील विहित करण्यात येईल अशा वेळी मंडळ, पुढील आगामी वर्षासंबंधी मंडळाच्या जमा रकमा व खर्च दर्शविणारा अर्थसंकल्प तयार करील व सादर करील व त्याच्या विहित करण्यात येतील इतक्या प्रती राज्य शासनास पाठवील. तसेच, मंडळ पुढील आगामी वर्षासाठी केलेल्या कामाचा कार्यक्रम तयार करून तो राज्य शासनाच्या मान्यतेसाठी सादर करील.

(२) त्या वर्षभरात कामाच्या कार्यक्रमामध्ये फेरफार करण्यास मंडळ सक्षम असेल, परंतु त्यासाठी मंजूर झालेल्या अर्थसंकल्पातील असे सर्व फेरफार व पुर्नविनियोजनें एका पूरक वित्तीय निवेदनाद्वारे राज्य शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली पाहिजेत.

**लेखे व लेखापरीक्षा.**

५१. (१) मंडळ यथोचित लेखे व इतर संबंधित अभिलेख ठेवील व राज्याचा महालेखापाल वेळोवेळी सांगेल अशा नमुन्यात व अशा रीतीने ताळेबंदासह लेख्यांचे वार्षिक विवरण तयार करील.

(२) मंडळाच्या लेख्यांची लेखापरीक्षा भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याशी विचारविनिमय करून राज्य शासन नेमील असा लेखापरीक्षक करील.

(३) मंडळाच्या लेख्यांची समवर्ती लेखापरिक्षा राज्य शासनास योग्य वाटेल अशा व्यक्तीकडून करण्यात येईल असा आदेश राज्य शासन देऊ शकेल. तसेच कोणत्याही विशिष्ट व्यवहाराची किंवा व्यवहारांच्या वर्गाशी अथवा मालिकेशी किंवा विशिष्ट मुदतीशी संबंधित असलेल्या मंडळाच्या लेख्यांची भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी नेमलेल्या लेखापरीक्षकाकडून विशेष लेखापरीक्षा करण्यासंबंधी राज्य शासन निदेश देऊ शकेल.

(४) लेख्यांची लेखापरिक्षा जेव्हां जेव्हां करण्यात येईल तेव्हा मंडळ लेखापरीक्षकाच्या त्यावरील प्रतिवृत्तासह त्याची एक प्रत राज्य शासनास पाठवील.

(५) राज्य विधिमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मंडळाचे लेखे त्यांच्यावरील लेखापरीक्षकाच्या प्रतिवृत्तासह ठेवण्याची व्यवस्था राज्य शासन करील.

मंडळास देय असलेल्या पैशांची जमीन महसुलाच्या थकबाकी-प्रमाणे वसुली.

५२. या अधिनियमाच्या उपबंधाद्वारे किंवा तदन्वये कोणत्याही व्यक्तीकडून मंडळास देण्याजोग्या किंवा मंडळाने त्याच्याकडून वसूल करण्याजोग्या सर्व रकमा आणि त्यासंबंधातील सर्व आकार व केलेला खर्च हे, वसुलीच्या कोणत्याही इतर पद्धतीस किंवा या अधिनियमामध्ये अन्यथा तरतूद केलेल्या पद्धतीस बाधा न आणता मंडळाने अर्ज केल्यानंतर, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्याजोगे असतील.

मंडळाकडे अभिहस्तांकित किंवा सुपूर्द केलेल्या मत्ता व दायित्वे यांचे मूल्यांकन.

५३. या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी मंडळाकडे अभिहस्तांकित किंवा सुपूर्द केलेल्या मालमत्तेचे व आपल्या निधीतून मंडळास जी दायित्वे पुरी करावी लागतील त्या दायित्वांचे मूल्यांकन मंडळ, राज्य शासन निदेश देईल अशा कालांतराने करील. असे मूल्यांकन राज्य शासनाची मान्यता घेऊन मंडळाने नेमलेल्या मूल्यनिर्धारिकाकडून करण्यांत येईल.

वार्षिक प्रतिवृत्त.

५४. (१) प्रत्येक वर्षाच्या अखेरीपासून सहा महिन्यांच्या आत, गतवर्षीच्या मंडळाच्या कार्यक्रमाचा संपूर्ण आढावा देणारे वार्षिक प्रतिवृत्त विहित करण्यात येईल अशा रीतीने मंडळ तयार करील व राज्य शासनास पाठवील.

(२) असे प्रत्येक प्रतिवृत्त राज्य शासनाकडे आल्याच्या वेळेपासून सहा महिन्यांच्या आत राज्य विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहासमोर ते ठेवण्यात येईल.

## प्रकरण ९

### मंडळाच्या शक्तीच्या तुलनेने महानगरपालिका व इतर व्यक्तीच्या शक्ती.

महानगर पालिकेकडून सहाय्य.

५५. (१) महानगरपालिका मंडळास आपली कर्तव्यें व कार्ये पार पाडण्यासाठी वेळोवेळी आवश्यक असेल असे साह्य व मदत देईल व माहिती पुरवील व मंडळास आपली कर्तव्ये व कार्ये यांचे पालन करण्यासाठी व ती पार पाडण्यासाठी आवश्यक असतील असे अभिलेख, नकाशे, आराखडे व इतर दस्तऐवज निरीक्षण व तपासणी यासाठी उपलब्ध करून देईल.

(२) महानगरपालिका, तिच्या करांच्या निर्धारणाशी संबंधित निर्धारण याद्यांच्या प्रती व इतर दस्तऐवज, मागणी करण्यात आल्यानंतर उपलब्ध करून देईल. अशा प्रती, या संबंधात प्राधिकृत करण्यात आलेला महानगरपालिकेचा अधिकारी यथोचितरीत्या प्रमाणित करील.

मंडळाच्या पुनर्बांधणी योजनांच्या बाबतीत महानगर-पालिका अधिनियम किंवा प्रादेशिक

५६. मुंबई महानगरपालिका अधिनियम किंवा महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ किंवा या दोन्ही अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमान्वये केलेले किंवा जारी केलेले किंवा केल्याचे किंवा जारी केल्याचे मानण्यात येणारे कोणतेही नियम, उप-विधी, विनियम, नकाशे, योजना, अधिसूचना, निदेश किंवा आदेश यात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये मंडळाने हाती घेतलेल्या किंवा घ्यावयाच्या [कोणत्याही पुनर्बांधणी योजनेमुळे किंवा योजनांमुळे] बेघर झालेल्या किंवा बेघर होण्याचा संभव असलेल्या भोगवटदारांना पर्यायी निवासस्थाने पुरविण्याची निकड लक्षांत घेऊन, राज्य शासनास महानगरपालिकेशी विचार विनिमय केल्यानंतर सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे अशा कोणत्याही योजनेच्या किंवा योजनांच्या वर्गाच्या बाबतीत उपरोक्त उपबंधापैकी सर्व किंवा कोणतेही उपबंध शिथिल करता येतील, किंवा तत्सम

आदेशाद्वारे असा निदेश देता येईल की, असे कोणतेही उपबंध ते (शासन) आदेशात विनिर्दिष्ट करील अशा फेरफारांच्या व शर्तींच्या अधीन अशा कोणत्याही योजनेला किंवा योजनांच्या वर्गाला लागू होतील.

व नगररचना अधिनियम यातील विवक्षित उपबंध शिथिल करणे किंवा त्यात फेरफार करणे.

मंडळाकडून दुरुस्त करण्यात किंवा पुन्हा बांधण्यात येणाऱ्या इमारतीसंबंधी नोटीस देण्याची व परवानगी मिळविण्याची कार्यपद्धती.

५७. दुरुस्त करावयाच्या किंवा पुन्हा बांधावयाच्या कोणत्याही इमारतीच्या संबंधी कोणतीही नोटीस द्यावी लागणार असेल किंवा कोणताही अर्ज करावा लागणार असेल आणि आयुक्त किंवा इतर प्राधिकरण यांची मान्यता मंजूरी, संमती किंवा अन्यथा परवानगी मिळविणे ,निकटपूर्ववर्ती कलमामध्ये नमूद केलेल्या कोणत्याही उपबंधान्वये आवश्यक असेल तर नियोजीत काम सुरू करण्यापूर्वी आयुक्त किंवा संबंधित प्राधिकरण यांना त्या कामाची वाजवी नोटीस मंडळ देईल तर आवश्यक ती परवानगी मिळविण्यात आली असल्याचे मानण्यात येईल. अशा नोटीशीसोबत नकाशे, इतर संबंधित दस्तऐवज व माहिती असेल. अशी नोटीस मिळाल्यानंतर व आवश्यक वाटेल अशी चौकशी करण्यात आल्यानंतर आयुक्त किंवा इतर प्राधिकरण नियोजित कामासंबंधी त्यास किंवा त्याला ज्या हरकती किंवा सूचना करणे योग्य वाटेल अशा कोणत्याही हरकती किंवा सूचना यांचे एक निवेदन तीस दिवसांच्या आत राज्य शासनास सादर करील. अशाप्रकारे सादर केलेली प्रत्येक हरकत व सूचना राज्य शासन विचारात घेईल व त्यास उचित वाटेल अशी चौकशी (कोणतीही असल्यास) केल्यानंतर त्यावर आदेश देईल व ते काम अशा आदेशांच्या अनुसार पार पाडण्यात येईल.

दुरुस्त्या पार पाडण्यासंबंधी इतर प्राधिकरणे व व्यक्ती यांच्या शक्तीची व्यावृत्ती.

५८. (१) उपकर बसविलेल्या कोणत्याही इमारतीच्या कोणत्याही दुरुस्त्या पार पाडण्यासंबंधी किंवा त्यावरील कोणतेही बांधकाम करण्यासंबंधी किंवा मुंबई महानगरपालीका अधिनियमाची कलमे ३५४ किंवा ४८९ किंवा ४९९ किंवा त्याचे इतर कोणतेही उपबंध याअन्वये किंवा मुंबई भाडे नियंत्रण, पथिकाश्रम व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम ,१९४७ यातील कलमे १०-डी किंवा १०-इ किंवा इतर कोणतेही उपबंध याअन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधीच्या उपबंधान्वये अशा इमारतीच्या संबंधी प्राधिकार दिलेली इतर कोणतीही कारवाई करण्यासंबंधी आयुक्त किंवा इतर कोणतेही प्राधिकरण यांच्या शक्तींना किंवा कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या संस्थेच्या अधिकारांना किंवा दायित्वांना या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे बाधा पोचणार नाही :

परंतु, अशा कोणत्याही इमारतीच्या संबंधात कोणत्याही संरचनात्मक दुरुस्त्या पार पाडण्यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४९९ अन्वये आयुक्ताची मान्यता मिळविण्याचा प्रयत्न कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यक्तीच्या संस्थेने केला तर आयुक्तास अशी मान्यता प्रथम मंडळाशी विचारविनिमय केल्यानंतरच देता येईल :

आणखी असे की, हा अधिनियम अंमलात असेल त्या कालावधीत, मुंबई भाडे नियंत्रण पथिकाश्रम व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७ यातील कलमे १०-ड व १०-इ यांचे उपबंध संरचनात्मक दुरुस्तीसाठी हाती घेतलेल्या किंवा हाती घेण्याचे योजिलेल्या इमारतींशी संबंधित असतील तेथवर ते कोणत्याही इमारतीस लागू होणार नाहीत.

(२) अशा दुरुस्त्या पार पाडताना किंवा अशी बांध कामे पार पाडताना किंवा अशी कारवाई करताना आयुक्त किंवा उपरोक्त कोणतेही इतर प्राधिकरण किंवा कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्तींची संस्था यांना संरचनात्मक दुरुस्त्यासुद्धा पार पाडणे आवश्यक वाटले तर आणि मंडळास त्याची पूर्वसूचना दिल्यानंतर आयुक्त किंवा अशा प्राधिकरणाने किंवा अशा व्यक्तीने किंवा व्यक्तींच्या संस्थेने अशा दुरुस्त्या पार पाडल्या तर यथास्थिति आयुक्त किंवा असे प्राधिकरण किंवा अशी व्यक्ती किंवा व्यक्तींची संस्था यांना प्रत्यक्षात पार पाडलेल्या संरचनात्मक दुरुस्त्यांचा खर्च मंडळाकडून वसूल करण्याचा हक्क असेल. आवश्यक तो तपशील मंडळास पुरविण्यात आल्यावर मंडळ, त्याला योग्य वाटेल अशी

303



चौकशी केल्यानंतर, अशा दुरुस्त्यांसाठी त्यांच्याकडून देय असेल ती रक्कम देईल. उभयपक्षी संमतीपत्र झाले नाही तर मंडळाने द्यावयाची रक्कम राज्य शासनाने नियुक्त केलेल्या लवादातर्फे ठरविण्यात येईल व लवादाने ठरविलेली रक्कम उभयपक्षांवर बंधनकारक असेल.

## प्रकरण १०

### नियम आणि विनियम

ाम ण्याची ती.

५९. (१) या अधिनियमाखालील सर्व नियम करण्याच्या शक्तीचा वापर **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे राज्य शासनाकडून करण्यात येईल.

(२) या अधिनियमात इतरत्र समाविष्ट असलेल्या नियम करण्याच्या शक्तीस बाध न आणता, राज्य शासनास, सर्वसाधारणपण या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी या अधिनियमांशी सुसंगत असतील असे नियम करता येतील.

(३) या अधिनियमान्वये करण्यात आलेले सर्व नियम पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असतील.

(४) ह्या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या अधिनियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील, तर, अशा अधिसूचनेच्या तारखेपासून यथास्थिति अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच नियम अंमलात येतील किंवा ते अंमलात येणार नाहीत. तथापी, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे उक्त नियमांअन्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाध येणार नाही.

ियम याची े.

६०. (१) मंडळास, वेळोवेळी राज्य शासनाची पूर्व मंजुरी घेऊन, या अधिनियमाशी वा त्याखालील नियमांशी सुसंगत असतील असे पुढील पैकी सर्व किंवा कोणताही किंवा कोणत्याही बाबीसंबंधात विनियम करता येतील.—

(अ) मंडळाचे व त्याच्या समित्यांचे कामकाज चालविण्यासंबंधी अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(ब) मंडळाने द्यावयाच्या नोटीसांचे नमुने व ज्या रीतीने त्या बजावण्यात येतील ती रीत;

(क) मंडळाने ठेवलेल्या इमारतींची व्यवस्था आणि त्यांचा वापर व भोगवटा यासंबंधीच्या अटी व शर्ती ;

(ड) योजना व अंदाजपत्रके तयार करण्याची रीत व पद्धती, विश्वसनीय कंत्राटदार, वास्तुशास्त्रज्ञ व अभियंते यांच्या मान्य याद्या तयार करणे, निविदा मागवणे, निविदा स्वीकारणे, फीचा तक्ता आणि या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी मंडळाने हाती घेणे आवश्यक असतील अशा बांधकामाचे शीघ्रतेने आर्यान्वियन व बजावणी करण्यात मंडळास त्याच्यामते सहाय्यभूत ठरतील अशा इतर संलग्न बाबी ;

(ई) या अधिनियमाच्या उपबंधाखालील विनियमांद्वारे तरतूद करावी लागेल किंवा तरतूद करता येईल अशी इतर कोणतीही बाब ;

(फ) सर्वसाधारणपणे मंडळाच्या व्यवहाराच्या कार्यक्षम प्रशासनांसाठी ;

(२) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबीसंबंधी कोणतेही विनियम करणे अथवा त्या पोट-कलमान्वये केलेल्या कोणत्याही विनियमात सुधारणा करणे आवश्यक अथवा इष्ट आहे असे राज्य शासनास आढळून येईल तर, राज्य शासनास त्याजकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वेळेच्या आत असे विनियम किंवा सुधारणा करण्या-संबंधी मंडळास फर्माविता येईल. विनिर्दिष्ट केलेल्या वेळेच्या आत मंडळ असे विनियम अथवा सुधारणा करण्यास कसूर करील तर, राज्यशासनास स्वतःच असा विनियम किंवा सुधारणा करता येईल, व अशा रीतीने करण्यात आलेले विनियम अथवा सुधारणा या, पोट-कलम (१) अन्वये मंडळाने केल्या आहेत असे मानण्यात येईल.

## प्रकरण ११

### नियंत्रण

६१. या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याच्या कारणाकरिता राज्य शासनास आवश्यक अथवा इष्ट वाटेल त्याप्रमाणे या अधिनियमाखालील आपल्या शक्तींचा वापर करणे, आपली कर्तव्यें अथवा कामें पार पाडणे या संबंधात राज्य शासनास या मंडळास सर्वसाधारण किंवा विशेष निदेश देता येतील; आणि मंडळास या निदेशांचे अनुसरण करणे व त्यानुसार कृती करणे बंधन-कारक असेल. राज्य शासनाने निदेश देणे.

६२. राज्यशासनास, या अधिनियमान्वये अथवा तदन्वये ज्या कोणत्याही बाबींच्या संबंधात त्यांची मंजूरी मान्यता किंवा संमती आवश्यक असेल अशा बाबींच्या संबंधात आणि या अधि-नियमाखालील आपल्या शक्ती व कर्तव्यें यांच्याशी संबंधित अशा इतर कोणत्याही बाबींच्या संबंधात त्यास योग्य वाटतील त्याप्रमाणे स्थानिक चौकशा करता येतील. स्थानिक चौकशीविषयी तरतुदी.

६३. (१) या अधिनियमान्वये किंवा तदन्वये मंडळावर लादलेले किंवा टाकलेले कोणतेही कर्तव्य, काम अथवा दायित्व पार पाडण्यांत मंडळाने कसूर केली आहे याबद्दल राज्य शासनाची खात्री होईल तर, राज्य शासनास, आदेशाद्वारे ते पार पाडण्यासाठी मुदत निश्चित करता येईल आणि त्यानुसार मंडळास नोटीस देता येईल. कर्तव्यपाल-नात कसूर.

(२) असे कर्तव्य किंवा कार्य किंवा दायित्व पार पाडण्यासाठी, अशा रीतीनें निश्चित करण्यात आलेल्या मुदतीत ते पार पाडण्यांत मंडळाने कसूर किंवा हयगय केली आहे असे राज्य शासनाचे मत होईल तर राज्य शासनाने आदेशाद्वारे मंडळ विसर्जित करणे हे विधीसंमत असेल.

(३) मंडळ विसर्जित करण्यात आल्यानंतर आणि प्रकरण २ मध्ये दिलेल्या रीतीप्रमाणे ते पुन: नियुक्त करण्यात येईपर्यंत या अधिनियमाखालील मंडळाच्या शक्ती, कर्तव्यें आणि कामे ही, राज्य शासन किंवा **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करण्यात येईल असा राज्य शासनाचा अधि-कारी किंवा राज्य शासनाचे अधिकारी अथवा अधिकाऱ्यांचे मंडळ यास पार पाडता येतील.

## प्रकरण १२

### संकीर्ण

६४. मंडळाच्या सर्व अनुज्ञा आदेश निर्णय, नोटिसा व इतर कागदपत्र हे, मंडळाकरिता आणि मंडळाच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा या बाबतीत मंडळ प्राधिकृत करील असा इतर अधिकारी किंवा असे इतर अधिकारी यांच्या सहीने अधिप्रमाणित करण्यात येतील. मंडळाचे आदेश व दस्तऐवज याचे अधि-प्रमाणन.

विवरणे इत्यादि पुरविणे.

६५. मंडळ, राज्य शासन वेळोवेळी फर्मावील त्याप्रमाणे आपले व्यवहार मंडळाच्या प्रभाराधीन मालमत्ता, निधी आणि कार्य किंवा कोणतेही प्रस्तावित काम किंवा योजना यासंबंधीची विवरणे, आकडेवारी, अहवाल लेख्ये, व इतर माहिती राज्य शासनास पुरवील.

मंडळाचे सदस्य, अधिकारी नोकर लोकसेवक असणे.

६६. मंडळाच्या अधीन काम करीत असलेले सर्व सदस्य, अधिकारी व सेवक हे, या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधास अनुसरून काम करीत असताना अथवा काम करीत असल्याचे अभिप्रेत असेल तेव्हां भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

सद्भावनापूर्वक केलेल्या कृत्यांचे संरक्षण.

६७. मंडळाच्या अधीन सेवा करीत असलेल्या कोणत्याही सदस्याने अधिकाऱ्याने किंवा, सेवकाने अथवा शासनाने या अधिनियमान्वयें किंवा तदन्वयें करण्यांत आलेल्या कोणत्याही नियमान्वये किंवा विनियमान्वयें सद्भावनापूर्वक केलेल्या अथवा करावयाचे योजिलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल त्याच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला अथवा इतर वैध कार्यवाही दाखल करता येणार नाही.

खटला करण्याचा प्राधिकार.

६८. मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा मंडळ, सामान्य किंवा विशेष आदेशान्वये याबाबतीत प्राधिकृत करील अशा अधिकाऱ्यापैकी कोणताही अधिकारी यांजकडून तक्रार करण्यांत येईल अथवा त्याजकडून मिळालेल्या माहितीवरून असेल त्याशिवाय, कोणतही न्यायालय, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.

सामोपचाराने अपराध मिटविणे.

६९. (१) मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा मंडळ या बाबतीत सामान्य अथवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत करील असा इतर कोणताही अधिकारी यास, खटला दाखल करण्यात येण्यापूर्वी किंवा त्यानंतर या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध सामोपचारान मिटविता येईल.

(२) अपराध सामोपचाराने मिटविण्यात येईल तेव्हां अपराधी अभिरक्षेत असेल तर, त्यास मुक्त करण्यात येईल आणि सामोपचाराने मिटविण्यात आलेल्या अपराधासंबंधात त्याच्याविरुद्ध आणखी कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही.

प्रत्यायोजन करण्याची शक्ती.

७०. राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमान्वयें किंवा त्याअन्वयें करण्यांत आलेल्या नियमान्वयें त्यास जिचा वापर करता येईल अशी कोणतीही शक्ती (नियम करण्याच्या शक्ति व्यतिरिक्त) राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे प्रत्यायोजित करता येईल.

भाडे नियंत्रण अधिनियमाचे कलम २३ तात्पुरते निलंबित करण आणि मालमत्ता हस्तांतरण अधिनियम प्रवर्तित करण्याना लागू करणे.

७१. हा अधिनियम अंमलांत असेल त्या मुदतीत उपकर बसविण्यात आलेल्या इमारतींच्या बाबतीत, कोणत्याही भोगवटदारास भाड्याने दिलेल्या जागा, चांगल्या व राहण्यास योग्य अशा दुरुस्त स्थितीत ठेवणे मालकास बंधनकारक असणार नाही आणि तदनुसार मुंबई भाडे नियंत्रण पथिकाश्रम व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७ याच्या कलम २३ चे उपबंध तहकूब करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल आणि संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२ याचे त्या संबंधातील उपबंध, अशा मुदतीत लागू होतील.

७२. या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवेल तर, राज्य शासनास, आदेशाद्वारे, प्रसंगानुरूप परंतु मंडळ प्रस्थापित झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांनंतर नसेल अशा मुदतीत, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी या अधिनियमाच्या उद्दिष्टांशी व प्रयोजनांशी विसंगत नसणारी कोणतीही गोष्ट करता येईल.

अडचणी दूर करण्याची शक्ती.

## अनुसूची

(कलम २७ पहा)

या अधिनियमाखालील उपकर इमारत व जमिनी यांवर ज्या दराने बसविण्यात येईल तो दर——

(१) (अ) एखादी इमारत समाविष्ट असलेल्या कोणत्याही मालमत्तेचे प्रवर्ग 'अ' मध्ये वर्गीकरण करण्यात आले असेल त्या बाबतीत——मालमत्तेच्या करयोग्य मूल्याच्या २५ टक्के या दराने.

(ब) मंडळाने अशा कोणत्याही इमारतीची या अधिनियमान्वये संरचनात्मक दुरुस्ती केलेली असेल त्याबाबतीत मालमत्तेच्या करयोग्य मूल्याच्या ४० टक्के या दराने.

(२) (अ) एखादी इमारत समाविष्ट असलेल्या कोणत्याही मालमत्तेचे प्रवर्ग 'ब' मध्ये वर्गीकरण करण्यात आले असेल त्याबाबतीत——मालमत्तेचे करयोग्य मूल्याच्या २० टक्के या दराने.

(ब) मंडळाने अशा कोणत्याही इमारतीची या अधिनियमान्वये संरचनात्मक दुरुस्ती केलेली असेल त्याबाबतीत——मालमत्तेच्या करयोग्य मूल्याच्या ३० टक्के या दराने.

(३) (अ) एखादी इमारत समाविष्ट असलेल्या कोणत्याही मालमत्तेचे वर्ग 'क' मध्ये वर्गीकरण करण्यात आले असेल त्या बाबतीत——मालमत्तेच्या करयोग्य मूल्याच्या १५ टक्के या दराने.

(ब) मंडळाने अशा कोणत्याही इमारतीची या अधिनियमान्वये संरचनात्मक दुरुस्ती केलेली असेल त्याबाबतीत——मालमत्तेच्या करयोग्य मूल्याच्या २० टक्के या दराने.

(यथार्थ अनुवाद)

**वा. ना. पंडीत**

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.